पश्चिम विदर्भातील सर्वाधिक अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

14 वर्ष वर्धापन दिन

अकोला ■ वर्ष १५ ■ अंक ३२५ ■ गुरूवार, दि.४ जून २०२६ ■ मुल्य ५ रुपये ■ पृष्ठे ८

RNI No.- MAHMAR/ 2012 / 49642 ■ Postal Regn. No. AKL DN /283 / 2024-2026 http://epaper.citynewssuperfast.com

# भूमि अभिलेख विभागातील गैरव्यवहाराचा पर्दाफाश

## निलंबित उपअधीक्षक पंकज पवार यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल

RRC News सिटी न्यूज सुपरफास्ट IMPACT

प्रतिनिधी ४ जून

**अकोला:** अकोला भूमी अभिलेख कार्यालयातील तत्कालीन आणि सध्या निलंबित असलेले उपअधीक्षक पंकज शिवदास पवार यांच्याविरुद्ध प्रशासकीय अधिकारांचा गैरवापर, फसवणूक आणि शासकीय दप्तरात मोठ्या प्रमाणावर फेरफार केल्याप्रकरणी अखेर फौजदारी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पण, या सर्व प्रकरणात तोंडी आदेश देणारे आणि चौकशी समितीत सदस्य असणाऱ्यांना या सर्व प्रकरणात वगळण्यात आले आहे. इतकेच नाही तर ज्या विविध प्रकरणात विभागीय चौकशी सुरु आहे. त्याच प्रकरणात फौजदारी स्वरुपाचा गुन्हा दाखल करणे हे कितपत न्यायोचित आहे असा ही प्रश्न विचारला जात आहे. या सर्व प्रकरणात तपास अधिकाऱ्यांना अद्याप चौकशी समितीचा पुर्ण अहवाल का दिला नाही अशी विचारणा होत आहे. त्याच बरोबर केवळ उपअधिक्षक पंकज पवार हेच कसे काय गुन्हेगार ठरले. लाभार्थ्यांच्या



बरोबर, विभागातील एजंट आणि विभागातील त्यांच्या कनिष्ठांनी जो अहवाल विविध प्रकरणात दिला त्यानंतर त्यांनी मान्यता दिली. इतकेच नाही तर केवळ उपअधिक्षक यांच्या मान्यतेने प्रकरण पुर्णत्वास गेले नाही काही प्रकरणात वरिष्ठांनी सरकारी पोर्टलवर से दिल्यानंतरच प्रकरणे मार्गी लागली असे असताना केवळ एकटा पंकज पवार याला दोषी ठरवित इतर आरोपींना वगळण्याचा उद्योग केला कोणी असा प्रश्न उपस्थित होत आहे. निलंबित उपअधिक्षक पंकज पवार यांच्या १ जून २०२३ ते ३० जून २०२५ या कार्यकाळातील कामकाजाची सखोल चौकशी करण्यात आली होती. अमरावती प्रदेशचे भूमी अभिलेख उपसंचालक आणि पुणे जमाबंदी आयुक्तांच्या




मार्गदर्शनाखाली झालेल्या या चौकशीचा अहवाल २ जानेवारी २०२६ रोजी सादर करण्यात आला होता. या अहवालात पवार यांनी पदाचा गैरवापर करून गंभीर गैरव्यवहार केल्याचे निष्पन्न झाले आहे.

या सर्व गंभीर बाबींचा विचार करून भूमी अभिलेख अमरावती उपसंचालकांच्या निर्देशानुसार, अकोल्याच्या जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख भारती खंडेलवाल यांनी सिटी कोतवाली पोलिसात तक्रार दिली. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस करत असून, या रॅकेटमध्ये महसूल विभागातील आणखी काही अधिकाऱ्यांचा किंवा कर्मचाऱ्यांचा सहभाग आहे का, याचाही शोध घेतला जात आहे.

### चौकशीत समोर आलेले गंभीर गैरप्रकार

- पवार यांनी शासकीय सेवेत असताना शासनाचा विश्वासघात करून खाजगी व्यक्तींच्या फायद्यासाठी अनेक बेकायदेशीर कृत्ये केल्याचे चौकशीत स्पष्ट झाले आहे. या प्रकरणात नेमके खाजगी व्यक्ती कोण त्यांचा तपशील मात्र जाहिर करण्यात आला नाही.
- तब्बल १५ प्रकरणांमध्ये मालमत्तेचे अधिकार, सत्ता प्रकार बदलणे आणि मयत खातेदारांच्या नावे नियमबाह्य पद्धतीने अर्ज मंजूर करणे. यातील संबंधित मालमत्ताधारक कोण, त्यांचे एजंट कोण, त्यांचे प्रकरणे कुठल्या ज्युनिअर आणि सिनिअरने मंजुर केले.
- ७ प्रकरणांमध्ये तात्पुरत्या भाडेपट्ट्याच्या मिळकत पत्रिका तयार करणे, तसेच केवळ जागेची पाहणी करून नवीन मिळकत पत्रिका नियमबाह्यपणे बनवणे. यातील लाभार्थी कोण अशी विचारणा आता सुरु झाली आहे. त्यामुळे त्यांच्यावर शासकीय कागदपत्र बनावट केल्याचा गुन्हा का दाखल नाही.
- खाजगी व्यक्तींच्या फायद्यासाठी मालमत्तेचे क्षेत्र वाढवणे, सार्वजनिक सुविधांच्या जागांवर खाजगी व्यक्तींची नावे नोंदवणे आणि जमिनींचे एकत्रिकरण (सामिलीकरण) करताना क्षेत्रफळ वाढवणे. हा उद्योग कोणासाठी केला आणि त्याच्या नावाचा उल्लेख का नाही अशी विचारणा केली जात आहे.
- महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम १५५ चे उल्लंघन करून अधिकाराबाहेर जाऊन आदेश देणे आणि प्रमाणपत्रे वाटणे. असे करताना ज्या लाभार्थ्यांसाठी हा सरकारी दस्त बदलण्यात आला त्याच्या विरोधात गुन्हा दाखल होण्याची गरज व्यक्त केली जात आहे.
- अकोला महानगरपालिकेकडे भूसंपादनाद्वारे हस्तांतरित झालेल्या शासकीय जागेवर खाजगी व्यक्तींची नावे बेकायदेशीरपणे चढवणे. हा खाजगी व्यक्ती कोण ज्याच्या नावावर शासकीय जागेचा भाग दिला गेला. त्यांच्या विरोधात गुन्हा का दाखल केला गेला नाही. अशी विचारणा होत आहे.

# कौलखेड स्कूल ऑफ स्कॉलर्सची लिज तर कधीची संपली

## ▶▶अकोला महापालिकेचा भोंगळ कारभार आला समोर ▶▶मनसे नेत्यांनी जमीन मोकळी करण्याची केली मागणी




प्रतिनिधी ४ जून

**अकोला:** कौलखेड येथील स्कुल ऑफ स्कॉलर्सची लीज तर करारानंतर आठ वर्षात संपली आहे. तरी देखील महापालिकेच्या भ्रष्ट अधिकाऱ्यांनी त्याकडे का लक्ष दिले नाही असा प्रश्न मनसे जिल्हाध्यक्ष पंकज साबळे यांनी केला आहे. स्थानिक नागरिकांच्या हक्काची ओपन स्पेस त्यांना त्वरीत खुली करुन देण्याची मागणी मनसेने केली आहे.

कौलखेड येथील स्कुल ऑफ स्कॉलर्स ही ओपन स्पेस मध्ये बांधल्या गेली आहे. ओपन स्पेस मध्ये बांधकाम करताना महापालिकेसोबत झालेल्या करारानुसार केवळ दहा टक्के बांधकामाची परवानगी अपेक्षित आहे. पण, ग्रीन झोन ची जागा ताब्यात ठेवत दहा टक्के पेक्षा अधिकचे बांधकाम स्कुल ऑफ स्कॉलर्सने केल्याची धक्कादायक माहिती मिळाली आहे. ओपन स्पेस स्थानिकांसाठी खुली न ठेवता ती कपाउंडवॉल घेत बंदिस्त केल्या गेली. इतकेच नाही तर शाळेचे चौकीदार स्थानिकांना हाकलून लावत असल्याची धक्कादायक माहिती मिळाली. स्कुल ऑफ स्कॉलर्स ने ओपन स्पेस त्वरीत स्थानिकांसाठी खुली करावी अशी मागणी मनसे जिल्हाध्यक्ष पंकज साबळे यांनी केली आहे.

दरम्यान, या विषयावर महापालिकेच्या नगर रचनाकार साबळे यांनी देखील कौलखेड येथील स्कुल ऑफ स्कॉलर्सच्या जागेविषयी असा धक्कादायक खुलासा केला आहे. त्यांनी देखील या विषयी माहिती देताना केवळ आठ वर्ष काही महिन्यांसाठी ही जागा लिजवर दिली होती. त्यानंतर नाही. त्यामुळे महापालिकेच्या कुठले अधिकारी या फाईलवर बसले होते. त्यांनी स्कुल ऑफ स्कॉलर्सची ओपन स्पेस स्थानिकांसाठी खुली का केली नाही अशी विचारणा आता सुरु झाली आहे. तर महापालिकेने नुकत्याच घेतलेल्या ठरावानुसार स्कुल ऑफ स्कॉलर्सची ओपन स्पेस स्थानिकांना सत्तारुढ भाजप मिळवून देईल काय अशी विचारणा होत आहे. दरम्यान, स्कुल ऑफ स्कॉलर्स व्यवस्थापन, मुख्याध्यापक यांच्याशी आम्ही संपर्क केला असता तो झाला नाही. तर त्यांच्या चौकीदाराने आमच्या प्रतिनिधींनी आत सोडलेच नाही.

### कौलखेड स्कूल ऑफ स्कॉलर्सचा भाडेपट्टा संपला

▶▶मौजा कौलखेड मंजूर अभिन्यासात खुली जागा २३४१ स्वे.मी होती. त्यापैकी खुल्या जागेपैकी १-टक्के जागा म्हणजे २४३ स्वे.मी ही जागा स्वर्गीय राधिकाबाई मेघे महिला शिक्षण संस्था तर्फे सचिव श्रीमती सुमिती राजेंद्र वानखडे यांना दिनांक २३ फेब्रुवारी २००६ रोजी ८ वर्ष ११ महिन्याच्या कालावधीसाठी भाडेपट्ट्याने दिली होती. त्यानंतरची जी काही कारवाई करायची होती, एकतर भाडेपट्टा वाढवण्याच्या संदर्भात किंवा खाली करण्यासंदर्भात, त्या संदर्भातली कारवाई महापालिकेकडून प्रलंबित आहे. सदर कारवाई महापालिकेतर्फे प्रस्तावित करण्यात येत आहे. सदर जागा ही कोणत्या परिस्थितीत संबंधितांना भाडेपट्ट्यावर दिलेली आहे, याचं सखोल प्रत्यक्षरीत्या स्थळ पाहणी करून, नेमकं भाडेपट्ट्यावर देण्यात आल्यानंतर किती बांधकाम जास्त केलं, किती कालावधी जास्त हे केला आणि कोणत्या वापरासाठी त्यांनी व्हायलेशन केलं, याबाबीची सविस्तर तपासणी करून पुढील कारवाई प्रस्तावित करण्यात येईल.

**साबळे नगर रचनाकार,** महापालिका अकोला.

### स्कूल ऑफ स्कॉलर्स खाली करु



▶▶कौलखेड येथील स्कूल ऑफ स्कॉलर्स एखाद्या खुल्या जागेवर १० टक्के पेक्षा जास्त बांधकाम केले गेले असेल, तर ती जागा सध्याच्या कब्जेदारकाकडून परत ताब्यात घेतली जाईल व पाडण्यात येईल. ताब्यात ओपन स्पेस देखभाल आणि दुरुस्तीसाठी त्याच परिसरातील स्थानिक नागरिकांच्या स्वाधीन केली जाईल. खुल्या जागांवर ज्यांनी बेकायदेशीरपणे ताबा मिळवला आहे, त्यांच्यावर कडक कारवाई करून त्या जागा खाली करून घेतल्या जातील.

**विजय अग्रवाल**
सभापती, स्थायी समिती मनपा, अकोला.

# मराठा आरक्षण : शासकीय यंत्रणा लागली कामाला, हेल्पलाइन नंबरही जारी

प्रतिनिधी ४ जून

**मुंबई :** मराठा आरक्षणासंदर्भात विशेष कक्ष स्थापन करण्यात येणार असून, आरक्षणासंदर्भातील नोंदी शोधणे, कुणबी जात प्रमाणपत्र, जात पडताळणी प्रमाणपत्र आदीबाबत नागरिकांना साह्य करण्यासंबंधी जिल्हाधिकारी कार्यालयामध्ये हेल्पलाइन क्रमांक सुरू करण्यात येणार आहे. प्रमाणपत्रासंदर्भात अडचणी दूर करण्यासाठी मंत्रालयातील कार्यालयात ९३२६५६२८१५ हा हेल्पलाइन क्रमांक सुरू केला असून, कार्यालयीन वेळेत या क्रमांकावर संपर्क साधता येईल, अशी माहिती मराठा आरक्षण उपसमितीचे अध्यक्ष राधाकृष्ण विखे-पाटील यांनी दिली.

मराठा आरक्षण उपसमितीची बैठक मंत्री विखे-पाटील यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात नुकतीच झाली. उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील, जलसंपदा मंत्री गिरीश महाजन, उद्योगमंत्री डॉ. उदय सामंत, सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंह भोसले, पर्यटन मंत्री शंभुराज देसाई आदी उपस्थित होते. 'मराठा आरक्षणाच्या प्रश्नासंदर्भात दिलेल्या आश्वासनांची निर्धारित वेळेत पूर्तता करण्यासाठी सर्व विभागांनी प्रशासकीय स्तरावर समन्वयाने कार्यवाही सुरू करावी. मराठा आरक्षणाच्या प्रश्नाबाबत संवेदनशीलतेने निर्णय होण्याच्या दृष्टीने अधिकाऱ्यांनी गांभिर्याने काम करावे. शिंदे समितीने शोधलेल्या नोंदी, शिंदे समितीच्या स्थापनेनंतर १३ लाख दाखल्यांचे झालेले वितरण; तसेच समिती स्थापन होण्यापूर्वी कुणबी प्रमाणपत्राचे झालेले वाटप याची माहिती जिल्हा आणि तालुका स्तरावर तातडीने संकलित करावी.




# मान्सून केरळमध्ये दाखल!

वृत्तसंस्था ४ जून

**तिरूअनंतपुरम :** केरळमध्ये मान्सून दाखल झाल्याची अधिकृत घोषणा भारतीय हवामान विभागाने केली. पुढील ४८ तासांत कोकण आणि दक्षिण महाराष्ट्रात पावसाची शक्यता वर्तवण्यात आली असून, विदर्भातील मान्सूनसाठी १५ जूनपर्यंत प्रतीक्षा करावी लागू शकते.

पुढील २-३ दिवसात मोसमी वारे महाराष्ट्रातील काही भाग व्यापू शकतात, अशी भारतीय हवामान विभागाची माहिती आहे. पुढील २-३ दिवसांत गोवा, महाराष्ट्राचा काही भाग, सोबतच तामिळनाडू, कर्नाटक, बंगालचा उपसागराचा काही भाग आणि ईशान्य भारतातील काही राज्यांमध्ये मान्सूनच्या आगमनासाठी अनुकूल परिस्थिती आहे. मान्सून केरळात १ जून रोजी दाखल होत असतो, मात्र यंदा तो ३ जून रोजी दाखल झाला आहे. याचदरम्यान, हवामान विभागाचे तज्ज्ञ प्रवीण कुमार यांनी महत्वाची माहिती दिली आहे. केरळमध्ये मान्सून धडकला असून यंदा तीन दिवस उशिराने आला आहे.

### पुढील ४८ तासांत कोकणात पाऊस

विदर्भात तापमान ४० ते ४२ अंशाचा घरात राहील. १० जून नंतर तापमान कमी होईल. केरळला सामान्यतः एक जूनच्या सुमारास दाखल होतो. आता तीन दिवस उशिरा केरळमध्ये दाखल झाला आहे. पुढील ४८ तासांत दक्षिण महाराष्ट्र त्यामध्ये कोकण मधला भाग तिथे पावसाचा अंदाज आहे, असं प्रवीण कुमार यांनी सांगितले.

### विदर्भात वादळीवाऱ्याचा मध्यम स्वरूपाचा पाऊस

मान्सूनच्या अनुषंगाने परिस्थिती अनुकूल आहे. विदर्भात साधारणतः १५ जूनच्या सुमारास मान्सून दाखल होतो. विदर्भात पुढील काही दिवस वादळीवाऱ्याचा मध्यमस्वरूपाचा पाऊस होईल. मात्र आता येणारा पाऊस हा अवकाळीच असेल, कारण मान्सूनच्या अनुषंगाने अजून विदर्भात अनुकुल वातावरण निर्माण व्हायचे आहे.




CMYK

# पेरणीपूर्वी पावसाच्या अंदाजावर शेतीचे योग्य व्यवस्थापन करणे आवश्यक!

खरीप शेती म्हणजे केवळ बियाणे पेरणे नव्हे, तर शहाणपणाची पावले उचलणे, वेळेवर निर्णय घेणे जे आपल्याला अनिश्चिततेपासून वाचवतात. पावसाचा मागोवा घेण्यापासून ते योग्य वाण निवडण्यापर्यंत, मातीची काळजी घेण्यापासून ते विम्याद्वारे पिकांचे संरक्षण करण्यापर्यंत, प्रत्येक पायरी आपल्यासाठी महत्वाची आहे. आजचा शेतकरी मात्र केवळ शेतकरी नाही, तर जोखीम व्यवस्थापकही आहे. बदलते हवामान, बाजारातील



बदलती मागणी आणि वाढता खर्च यामुळे केवळ पारंपरिक पद्धती पुरेशा राहिलेल्या नाहीत. येथेच तयारी, नावीन्य आणि सुरक्षिततेच्या उपाययोजना अंमलात येतात.आत्मविश्वासाने नियोजन करून आणि योग्य उपायांनी पिकांचे संरक्षण करून आपल्या खरीप शेती हंगामावर नियंत्रण ठेवा. कारण जेव्हा तुम्ही चांगली तयारी करता तेव्हा तुमची वाढ चांगली होते आणि तोच सोयीस्कर, पर्यावरणपूरक शेतीचा आधार असतो. खरीप हंगाम (जून ते ऑक्टोबर) हा भारतातील मुख्य शेती हंगाम आहे. या काळात चांगल्या उत्पादनासाठी योग्य जमिनीची मशागत, बियाण्यांची निवड, बीजप्रक्रिया, खतांचे योग्य व्यवस्थापन आणि पावसाच्या अंदाजावर आधारित पीक नियोजन करणे अत्यंत गरजेचे आहे.

**१. पूर्व मशागत आणि जमीन तयार करणे**
पावसाळ्यापूर्वी शेताची खोल नांगरणी करून घ्यावी, शेतातील कचरा, धसकटे वेचून शेत स्वच्छ करावे, शेवटच्या पाळीपूर्वी १० ते १२ गाड्या चांगले कुजलेले शेणखत जमिनीत मिसळावे, भारी जमिनीत पाण्याचा निचरा होण्यासाठी रुंद वरंबा आणि सरी पद्धतीचा वापर करावा.

**२. बियाण्यांची निवड आणि बीजप्रक्रिया**
पेरणीपूर्वी आपल्या जमिनीनुसार आणि कृषी विद्यापीठांनी शिफारस केलेल्या संकरित किंवा सुधारित वाणांचीच निवड करावी, बियाण्यांची उगवणक्षमता तपासून घ्यावी, पेरणीपूर्वी बियाण्यांना 'बीजप्रक्रिया' करणे आवश्यक आहे. यामुळे बुरशीजन्य रोग आणि किडींचा प्रादुर्भाव सुरुवातीलाच रोखता येतो. यासाठी ट्रायकोडर्मा, कार्बेन्डाझिम किंवा रायझोबियमचा वापर करावा.

**३. पेरणी कधी करावी-**
मॉन्सूनचे आगमन झाल्यानंतर जमिनीत ८० ते १०० मिमी पाऊस पडल्यामुळे वापसा (पेरणीयोग्य ओलावा) आल्यावरच पेरणी करावी. घाईघाईने कोरड्या जमिनीत किंवा कमी पावसात पेरणी करू नये. साधारणपणे जूनचा दुसरा आठवडा ते जुलैचा पहिला आठवडा हा पेरणीसाठी सर्वात योग्य कालावधी मानला जातो.

**४. खतांचे व्यवस्थापन-**
माती परीक्षण अहवालानुसारच रासायनिक खतांचा वापर करावा. पेरणीच्या वेळी संपूर्ण स्फुरद आणि पालाश द्यावे आणि नत्रचा पहिला हप्ता द्यावा. खते बियाण्यांच्या खाली २-३ सेमी अंतरावर पडतील, अशी पेरणी यंत्राची रचना असावी.

**५. तण नियंत्रण-**
पिकाच्या सुरुवातीच्या ३० ते ४५ दिवसांत शेत तणमुक्त ठेवणे महत्त्वाचे असते. यासाठी वेळेवर खुरपणी करावी किंवा आंतरमशागतीची कामे (डवरणी/कोळपणी) करावीत. तणनाशकांचा वापर करताना कृषी तज्ज्ञांचा सल्ला घ्यावा.

# आरोग्यदायी जीवनशैलीचा संदेश देण्यासाठी सायकल चालविणे उपयुक्त

दोन शतकांपासून वापरात असलेल्या सायकलचे वेगळेपण, दीर्घायुष्य आणि बहुउपयोगिता, तसेच ते वाहतुकीचे एक साधे, परवडणारे, विश्वासार्ह, स्वच्छ, पर्यावरणास अनुकूल आणि टिकाऊ साधन असून ते पर्यावरण संवर्धन आणि आरोग्यास प्रोत्साहन देते, हे मान्य करून आमसभेने ३ जून हा जागतिक सायकल दिन म्हणून घोषित करण्याचा निर्णय घेतला. यामुळे संबंधित घटकांना शाश्वत विकासाला चालना देणे, मुलामुलींसाठी शारीरिक शिक्षणासह शिक्षण अधिक मजबूत करणे, आरोग्याला प्रोत्साहन देणे, आजारांना प्रतिबंध करणे, सहिष्णुता, परस्पर सामंजस्य आणि आदर यांना प्रोत्साहन देणे, तसेच सामाजिक समावेशन आणि शांततेच्या संस्कृतीला चालना देणे यांसारख्या बाबींसाठी सायकलच्या वापरावर भर देण्यास आणि त्याला पुढे नेण्यास प्रोत्साहित केले गेले.



दरवर्षी ३ जून रोजी 'जागतिक सायकल दिन' साजरा केला जातो?सायकलचा वापर वाढावा, त्याद्वारे लोकांचे आरोग्य चांगले राहावे आणि पर्यावरणाचे रक्षण व्हावे, या उद्देशाने संयुक्त राष्ट्राने २०१८ मध्ये या दिनी अधिकृत घोषणा केली. सायकलचे मानवी आरोग्यासाठी आणि पर्यावरणासाठी काय फायदे आहेत.

दुचाकी सायकल ही वापरण्यास आणि विकत घेण्यास सोपी आणि स्वस्त असा वाहन पर्याय आहे. त्यामुळे सर्वांना सामावून घेणारे जागतिक स्तरावरील वाहन म्हणून सायकल कडे पाहणे याबद्दल हा दिवस साजरा करण्याचे ठरविले गेले. समाजतील कोणत्याही स्तरातील व्यक्तींना सायकल चालविण्याचा आनंद घेता यावा यासाठी या दिवशी विशेष सायकल यात्रा आयोजित केल्या जातात. सायकल हे वाहन सहिष्णुता, मानवता यांचे प्रतीक आहे असा संदेश यातून पोहोचविण्याचा प्रयत्न केला जातो. आरोग्यदायी जीवनशैलीचा संदेश देण्यासाठी सायकल चालविणे उपयुक्त आहे, असा संदेश यानिमित्ताने दिला जातो. २०१५ साली लेझेक सिबिस्की या समाजिक शास्त्र विषयाच्या प्राध्यापकांनी सर्वांसाठी सायकल याविषयी लेख लिहिला. त्यानंतर जाणीव जागृती होऊन सायकल विषयासाठी विशेष दिवस राखून ठेवणे याला महत्व मिळाले. सायकल हे निर्धुर बाहन असल्याने त्यामुळे हवेचे प्रदूषण होत नाही. जागतिक स्तरावरील पर्यावरण प्रश्न वाढता असल्याने सायकल चालवून हवेहे प्रदूषण कमी करण्याचा जागतिक पातळीवरील महत्वाचा संदेश या दिवशी दिला जातो

मध्यम तीव्रतेच्या नियमित शारीरिक हालचालींचे – जसे की चालणे, सायकल चालवणे किंवा खेळ खेळणे – आरोग्यासाठी महत्त्वपूर्ण फायदे आहेत. सर्व वयोगटांमध्ये, शारीरिकदृष्ट्या सक्रिय राहण्याचे फायदे हे अपघातांसारख्या संभाव्य धोक्यांपेक्षा जास्त असतात. काहीच शारीरिक हालचाल न करण्यापेक्षा थोडीफार हालचाल करणे चांगले. दिवसभरात तुलनेने सोप्या मार्गांनी अधिक सक्रिय राहून, लोक शिफारस केलेली सक्रियतेची पातळी अगदी सहजपणे गाठू शकतात. जागतिक आरोग्य संघटनेनुसार, चालण्यासाठी आणि सायकलिंगसाठी सुरक्षित पायाभूत सुविधा निर्माण करणे हा देखील अधिक आरोग्य समानता साधण्याचा एक मार्ग आहे. सर्वात गरीब शहरी घटकांसाठी, ज्यांना अनेकदा खाजगी वाहने परवडत नाहीत, चालणे आणि सायकलिंग हे वाहतुकीचे एक साधन ठरू शकते, ज्यामुळे हृदयविकार, पक्षाघात, काही प्रकारचे कर्करोग, मधुमेह आणि मृत्यूचा धोकाही कमी होतो. त्यानुसार, सुधारित सक्रिय वाहतूक केवळ आरोग्यदायीच नाही, तर ती न्याय्य आणि किफायतशीर देखील आहे. पायी चालणाऱ्या आणि सायकल चालवणाऱ्या लोकांच्या गरजा पूर्ण करणे, हे शहरांना लोकसंख्या वाढीपासून होणारे उत्सर्जन वेगळे करण्यास, तसेच हवेची गुणवत्ता आणि रस्त्यांवरील सुरक्षितता सुधारण्यास मदत करणाऱ्या गतिशीलता उपायांचा एक महत्त्वाचा भाग आहे. कोविड-१९ महामारीमुळे अनेक शहरांना त्यांच्या वाहतूक प्रणालींचा पुनर्विचार करण्यासही भाग पडले आहे.

जागतिक सायकल दिन सायकल वापरण्याच्या फायद्यांकडे लक्ष वेधतो, जे वाहतुकीचे एक साधे, परवडणारे, स्वच्छ आणि पर्यावरणास अनुकूल असे शाश्वत साधन आहे. सायकलमुळे हवा अधिक स्वच्छ राहते, वाहतूक कोंडी कमी होते आणि शिक्षण, आरोग्यसेवा व इतर सामाजिक सेवा सर्वात असुरक्षित लोकसंख्येसाठी अधिक सुलभ होतात. आर्थिक वाढीस चालना देणारी, असमानता कमी करणारी आणि हवामान बदलाच्या विरोधातील लढ्याला बळ देणारी एक शाश्वत वाहतूक व्यवस्था, शाश्वत विकास उद्दिष्टे साध्य करण्यासाठी अत्यंत महत्त्वाची आहे.

१५ मार्च २०२२ रोजी, आमसभेने शाश्वत विकासासाठी सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेमध्ये सायकलिंगला मुख्य प्रवाहात आणण्यासंबंधीचा ठराव संमत केला . यामध्ये यावर भर देण्यात आला की, सायकल हे शाश्वत वाहतुकीचे एक साधन असून ते शाश्वत उपभोग आणि उत्पादनाला चालना देण्यासाठी एक सकारात्मक संदेश देते, तसेच हवामानावरही त्याचा सकारात्मक परिणाम होतो.

# नगराध्यक्ष केंदळे अनिल, शहरातील समस्या करताहेत नील !



अभियंता श्री.अनिल केंदले यांनी नगराध्यक्ष पदाची सूत्रे घेऊन आज जवळ जवळ १५० दिवस पूर्ण झालेत. १५० दिवसात एखादा राजकारणात नवखा असलेला माणूस काय करेल ? त्यातही एखादा सज्जन, सहृदयी माणूस असेल तर कठीणच ! त्यात हे क्षेत्र म्हणजे ' येथे समस्त दुर्जन असतात लोकं ' अशी राजकारणाची ख्याती.

त्यामुळे सहाजिकच ' एक अकेला अनिल केंदले क्या करेगा ? अशी सर्वसामान्यांची प्रतिक्रिया होती.

पण एक शिकलेला,अभियंती वृत्ती असलेला माणूस ' योजक: तत्र दुर्लभ: ' ठरला.नियोजनबद्ध ,पारदर्शी आणी शिस्तबद्ध कारभारी असला तर काय करू शकतो हे आपल्याला १५० दिवसात दिसले.कुठलाही आततायीपणा नाही,आगाऊ मोठमोठ्या गप्पा नाहीत ,प्रसिद्धीचा हव्यास नाही , बडेजाव तर अजिबात नाही.सर्व अगदी शांतपणे,नियोजनानुसार ,ठाम भूमिका घेऊन लोकहिताची कामे श्री.अनिलभाऊ केंदले करतांना दिसताहेत. खर सांगू ! भाजपा उबाठा एकत्रित येण्याला माझा विरोध होता तो आजही आहे.सभागृहात विरोधी पक्ष हवाच यावर मी आजही ठाम आहे.गावाच्या दृष्टीने ते हितावह असते. शिवाय सर्व एकत्र आले तर ते केंदले साहेबांसारख्या संवेदनशील माणसाला गुंडाळून टाकतील असे माझे मत होते.

पण १५० दिवसाचा कार्यभार पाहता तसे होतांना दिसत दिसत नाही.सर्व नगरसेवक त्यांना शिस्तीत सहकार्य करतांना दिसत आहेत.आजवरच्या इतिहासात जितके सक्रिय नसतील तितके नगरसेवक प्रभागात सक्रिय होतांना दिसत आहेत.न.प.चे अधिकारी कर्मचारी देखिल बऱ्यापैकी कार्यतत्पर झालेले दिसत आहेत.

**एक अकेला अनिल केंदळे क्या कर सकेगा ?**
१) एक अनिल केंदले भर उन्हाळ्यात पाण्याचे नियोजन करून पाणी टंचाईचे संकट घालवू शकतो.
२) एक अनिल केंदले अनेक वर्षापासून रखडलेले रस्ते चकाचक करण्याचा जीवतोड प्रयास करतो.
३) एक अनिल केंदले प्रतिक्षेत असलेले नाट्यगृह सुसज्ज करू शकतो.
४) अंधारातले वाशिम बऱ्यापैकी प्रकाशमय करू शकतो.
५) अस्वच्छ वाशिमला स्वच्छतेकडे नेवू शकतो.
६) कचरा व्यवस्थापनावर जातीने लक्ष घालतोय.
७) बारा पंधरा तास फक्त वाशिमसाठी देतोय.
८)ज्ञानशक्ती,ईच्छाशक्ती आणी क्रियाशक्तीचा वापर करून वाशिमला सर्वांगसुंदर करण्याचा प्रामाणिक प्रयत्न करतोय.

नगराध्यक्ष म्हणून खरे उतरण्याचा त्यांचा प्रामाणिक प्रयत्न आहे.सगळे एकदम होणार नसले तरी प्रयत्न अचूक आणी प्रामाणिक आहेत.जे जे आम्हाला अपेक्षित आहे ते ते करण्याचा त्यांचा प्रयास कौतुकास्पद आहे.

छोटी अपेक्षा - आता एकदा टेम्पल गार्डन तूर्त जुजबी दुरुस्ती करून ' आहे त्या स्थितीत ' लोकांसाठी खुले करून द्या.दुरुस्त्या होत राहतील यथावकाश !लहान मुले,माता भगिनी,ज्येष्ठ नागरिक येतील तिथे.थोडेफार भेळ,आईसक्रीम,आकाशपाळणे,अशांना सशुल्क परवानगी द्या.असो !


श्रीमान अनिलजी केंदले साहेब ! आपला १५० दिवसाचा आलेख चांगला आहे.असेच निर्णय घ्या.असेच निर्भिड,निर्मोही,निरपेक्ष आणी निडर रहा ! आपल्या अशा प्रत्येक कार्यात वाशिमकर आपल्या सोबत आहेत.

आपल्या तंदुरुस्त १५० दिवसांबद्दल आपले अभिनंदन !

**मी साक्षी भावाने त्यांचे अवलोकन करीत आहे.त्यांचा कामाचा झपाटा आणी सपाटा पाहता**
१)त्यांच्यावर कोणाचा दबाव येवू शकत नाही
२)त्यांच्यावर जबरदस्ती कोणी करू शकत नाही
३)कोणी व्यक्तीगत स्वार्थासाठी वाशीमला वेठीस धरत असेल तर कठोर भूमिका घेतात.
४)जे जनहिताचे आणी जनमताचे तेच ते करतात.
५)दिसायला मृदुनी कुसुमादपी वाटणारे केंदले साहेब वङ्कादपी कठोरानी देखिल होऊ शकतात याचा प्रत्यय वाशिमकरांना येतांना दिसतो.
....................
**केंदले साहेब ! आपल्या समन्वय कौशल्याचेही कौतुक.असो.**
**लोकमताचा धांडोळा घेतला तर**
१)यंदाच्या उन्हाळयात नळाचे पाणी नियोजन उत्तम होते.
२)ज्या रस्त्यांसाठी ओरड होती ते रस्ते सुरु झालेत.
३)नाले,नाल्या सफाई,कचरा व्यवस्थापन समाधानकारक आहे.
४)नगराध्यक्ष दस्तूरखुद्द उन्हातान्हाची पर्वा न करता रस्त्यावर उतरून आढावा घेतांना दिसताहेत.
४)लोकभावनांचा आदर होतोय.
५) मुख्य म्हणजे नगराध्यक्ष कोणत्याच चांडाळचौकडीत अडकलेले दिसत नाहीत.माझ्या दृष्टीने श्री.अनिल केंदले यांना याबद्दल शाबासकी !

**विद्यावाचस्पती**
**प्रा.दिलीप जोशी**
वाशिम
मो. ९८२२२६२७३५

# दिन विशेष
## चतुरस्त्र अभिनयाने प्रेक्षकांना मोहिनी घालणारी अभिनेत्री नुतन



आज जयंती

नूतन (माहेरचे आडनाव समर्थ/सेन, सासरचे बेहल) यांचा जन्म ४ जून १९३६ रोजी झाला. त्या प्रामुख्याने हिंदी चित्रपटांमध्ये काम करणाऱ्या एक भारतीय चित्रपट अभिनेत्री होत्या. सुमारे चार दशकांच्या कारकिर्दीत त्यांनी ८० हून अधिक चित्रपटांमध्ये काम केले. ज्यात रोमान्सपासून सामाजिक-वास्तववादी नाट्य चित्रपटांपर्यंतचे प्रकार आहेत. भारतीय चित्रपटसृष्टीच्या इतिहासातील सर्वोत्कृष्ट अभिनेत्यांपैकी एक म्हणून ओळखल्या जाणाऱ्या नूतनला अनेकदा अपारंपरिक समजल्या जाणाऱ्या संघर्षग्रस्त स्त्रियांच्या पात्रांमध्ये तिच्या नैसर्गिक अभिनय शैलीसाठी ओळख मिळाली होती. तिच्या पुरस्कारांमध्ये सर्वोत्कृष्ट अभिनेत्रीसाठी विक्रमी पाच फिल्मफेअर पुरस्कारांचा समावेश आहे. १९७४ मध्ये नूतन यांना पद्मश्री हा भारताचा चौथा सर्वोच्च नागरी पुरस्कार मिळाला.

चित्रपट निर्माते कुमारसेन समर्थ आणि चित्रपट अभिनेत्री शोभना समर्थ यांच्या पोटी मुंबईत जन्मलेल्या नूतनने वयाच्या १४ व्या वर्षी तिच्या आईने दिग्दर्शित हमारी बेटी या चित्रपटातून आपल्या कारकिर्दीला सुरुवात केली. त्यानंतर तिने नगीना (१९५१) आणि हम लोग (१९५१) चित्रपटांमध्ये काम केले. सीमा (१९५५) मधील तिच्या भूमिकेने तिला व्यापक मान्यता मिळवून दिली आणि तिला सर्वोत्कृष्ट अभिनेत्रीचा पहिला फिल्मफेअर पुरस्कार मिळाला. ती १९६० च्या दशकात व १९७० च्या दशकाच्या उत्तरार्धापर्यंत प्रमुख भूमिका बजावत राहिली आणि सुजाता (१९५९), बंदिनी (१९६३), मिलन (१९६७) आणि मैं तुलसी तेरे आंगन की (१९७८) मधील भूमिकांसाठी तिने इतर चार प्रसंगी फिल्मफेअर पुरस्कार जिंकले. या काळातील तिच्या इतर काही चित्रपटांमध्ये अनाडी (१९५९), छलिया (१९६०), तेरे घर के सामने (१९६३), खानदान (१९६५), सरस्वतीचंद्र (१९६८), अनुराग (१९७२) आणि सौदागर (१९७३) यांचा समावेश होतो.

१९८० च्या दशकात, नूतनने व्यक्तिरेखात्मक पात्र साकारण्यास सुरुवात केली आणि तिच्या मृत्यूच्या काही काळापूर्वीपर्यंत ती काम करत राहिली. साजन की सहेली (१९८१), मेरी जंग (१९८५) आणि नाम (१९८६) यांसारख्या चित्रपटांमध्ये तिने मुख्यतः आईच्या भूमिका साकारल्या. मेरी जंग मधील तिच्या अभिनयामुळे तिला सर्वोत्कृष्ट सहाय्यक अभिनेत्री श्रेणीत सहावा आणि अंतिम फिल्मफेअर पुरस्कार मिळाला. नूतन यांनी नौदल लेफ्टनंट-कमांडर रजनीश बहल यांच्याशी १९५९ मध्ये विवाह केला होता. १९९१ मध्ये स्तनाच्या कर्करोगाने तिचा मृत्यू झाला. त्यांचा एकुलता एक मुलगा मोहनीश बहल हा अभिनेता आहे.

१९४५ मध्ये तिच्या वडिलांच्या नल दमयंती या चित्रपटात नूतन पहिल्यांदा लहानपणी कॅमेऱ्यासमोर दिसली. वयाच्या १४ व्या वर्षी तिची आई दिग्दर्शित हमारी बेटी (१९५०) मध्ये नायिकेची भूमिका करून तिच्या कारकिर्दीला सुरुवात केली. त्यानंतर रवींद्र दवे यांचा सस्पेन्स थ्रिलर चित्रपट नगीना (१९५१) आला आणि या चित्रपटातील नूतनच्या अभिनयाने तिला अधिक ओळख मिळाली. हा चित्रपट तिचा पहिला व्यावसायिक यश ठरला. त्याच वर्षी प्रदर्शित झालेला सामाजिक नाट्य चित्रपट हम लोग होता ज्यामुळे प्रेक्षकांमध्ये ती लोकप्रिय झाली. नगीना आणि हम लोग यांनी एक उगवता तारा म्हणून तिचे स्थान मजबूत केले.

# भारतातील एकमेव महिला विद्यापीठ श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी

श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ (एसएनडीटी विद्यापीठ) हे भारतातील एक महिला विद्यापीठ आहे. याची स्थापना महर्षी धोंडो केशव कर्वे यांनी केली. हे भारतातील पहिले महिला विद्यापीठ आहे. एसएनडीटीची स्थापना पुण्यातली असली तरी त्याचे स्थलांतर मुंबईस होऊन तिथेच खऱ्या विस्ताराला सुरुवात झाली. या विद्यापीठाशी संबंधित सगळी महाविद्यालये एसएनडीटी कॉलेज म्हणून ओळखली जाऊ लागली.




डिसेंबर, इ.स. १९१५ साली धोंडो केशव कर्वे यांनी इंडियन सोशल काँग्रेसच्या (भारतीय सामाजिक परिषद) अध्यक्षीय भाषणातून महिला विद्यापीठाची कल्पना सर्वप्रथम मांडली. ३ जून, इ.स. १९१६ रोजी विद्यापीठाची औपचारिक स्थापना झाली. पाच विद्यार्थिनींचा पहिला वर्ग ५ जुलै, इ.स. १९१६ रोजी सुरू होऊन विद्यापीठाच्या कामाला आरंभ झाला. इ.स. १९१६ साली या विद्यापीठाची स्थापना भारतवर्षीय महिला विद्यापीठ (इंडियन विमेन्स युनिव्हर्सिटी) या नावाने झाली. सर विठ्ठलदास ठाकरसींनी या विद्यापीठाला १५ लाख रुपयांची देणगी दिल्यानंतर विद्यापीठाला त्यांच्या आईचे नाव देण्यात आले. १९२० साली विद्यापीठाचे नाव 'श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ' असे झाले. विद्यापीठातर्फे सुरुवातीला जी.ए. (गृहीतागमा) आणि पी.ए. (प्रदेयागमा) अशा दोन पदव्या दिल्या जात असत. इ.स. १९५१ साली या विद्यापीठाला महाराष्ट्र सरकारची मान्यता मिळाली. इ.स. १९९४ च्या महाराष्ट्र विद्यापीठ कायद्यात एक वेगळे कलम (क्रमांक १०५) केवळ श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठासाठी आहे. या विद्यापीठास महाराष्ट्रात तसेच इतर कोणत्याही राज्यात आणि केंद्रशासित प्रदेशात महाविद्यालये संलग्नित करता येतात. इ.स. १९५२ ते १९५७ या कालावधीत दिवाणबहादुर झवेरी यांनी कुलगुरुपद सांभाळले व यानंतर मात्र एक तप (१९५७ ते १९६९) लेडी ठाकरसींनी. या शेवटच्या बारा वर्षांत १३ नवीन विभागांची/महाविद्यालयांची स्थापना झाली. यात मराठी, चित्रकला हे विभाग मुंबई व पुणे येथे, तसेच नर्सिंग महाविद्यालय, शिक्षणशास्त्र महाविद्यालय, गृहविज्ञान महाविद्यालय ही महत्त्वाची महाविद्यालये होती. अर्थशास्त्र, शिक्षणशास्त्र, ग्रंथपालनशास्त्र, फूड सायन्स अँड न्युट्रिशन अशा पदव्युत्तर विभागांचा समावेशही होता. १९७१ ते १९७५ या काळात आणखी ११ विभागांची भर पडली आणि शिवाय पुण्यात एक शिक्षणशास्त्र महाविद्यालय ही स्थापन झाले. भारतातील विद्यापीठात अन्यत्र न दिसणारे महिला विद्यापीठाचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे येथील शिक्षणशास्त्र विद्याशाखेतील अनेक विभाग आहेत. दोन शिक्षणशास्त्र विभाग, स्पेशल एज्युकेशन, शैक्षणिक तंत्रविज्ञान, मार्गदर्शन आणि समुपदेशन, शैक्षणिक व्यवस्थापन, भाषा अध्यापन, तसेच विद्यापीठ संचालित दोन शिक्षणशास्त्र महाविद्यालये सुद्धा आहेत.

**कर्वेंनी दूरसि शिक्षणाचा केला होता विचार**
कर्वे यांनी दूरस्थ शिक्षणाचा हा विचार विद्यापीठाच्या स्थापनेपासूनच केला होता. सुप्रसिद्ध अणुशास्त्रज्ञ डॉ. अनिल काकोडकर यांच्या मातोश्री दिवंगत कमलाताई काकोडकर आणि अशा अनेक स्त्रियांनी स्वतःचे घर, संसार, नोकरी, उद्योग सांभाळून दूरस्थ शिक्षण पद्धतीने उच्च शिक्षण घेतले. एम.कॉम. हा ८० क्रेडिटचा अभ्यासक्रम पूर्णतः ऑनलाइन प्रणालीने शिकवला जातो. आता ऑगस्ट २०१५ पासून एम.ए. इन एज्युकेशन हा अभ्यासक्रमही पूर्णतः ऑनलाइन करण्यात आला होता.

## साहित्यिक, लेखकांना आवाहन

**दैनिक सिटी न्यूज सुपरफास्ट** आता आठ पानांसह वाचकांना उपलब्ध होत आहे. अंकातील विविधा पानासाठी अकोला शहर तसेच जिल्ह्यातील साहित्यिक, लेखक, कवी यांनी त्यांचा मजकूर **८३९०६७०९९९** या **व्हॉटसअप** क्रमांकावर पाठवावा.
त्याला यथायोग्य प्रसिद्धी दिली जाईल. या अंकातील लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

सिटी न्यूज अकोला

गुरुवार, दि. ४ जून २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

# आठ जणांच्या घराला ठोकले सील

## गॅरेंटर, पार्टनर होण्यापासून टाळा

प्रतिनिधी ४ जून

**अकोला :** लोनसाठी हुशार माणसाने कोणाचे गॅरेंटर राहू नये आणि भागीदार फर्म मध्ये कोणाचे पॉर्टनर राहू नये. पण, अशाच गॅरेंटर आणि पॉर्टनर म्हणून राहिलेल्या आठ परिवारासमोर स्वतःचे राहते घर खाली करुन द्यावे लागले आणि त्याला बँकेने सिल ठोकले. तहसिलदाराच्या आदेशाने झालेल्या कारवाईवर अनेक प्रश्न उपस्थित केले गेले.



अकोला येथील 'तिरुपती इंटरप्रायजेस पार्टनरशिप फर्म' आणि त्याचे भागीदार मनोहर बापुराव चव्हाण यांनी अशी काही जादू केली की अकोला अर्बन बँकेकडून तीन कोटींचे लोन काही वर्षांपुर्वी घेतले. यासाठी मनोहर चव्हाण याने पार्टनरशीप फर्म स्थापन केली आणि मित्रांच्या शेजारच्या घराचे प्रॉपर्टीचे कागदपत्रे बँकेत गहाण ठेवले. त्या आधारे लोन घेतले गेले. पण, ते काही फेडले गेले नाही. पार्टनरशिप फर्म ही केवळ कागदोपत्री होती. सर्व व्यवहार मनोहर चव्हाण पाहत होते. त्यांनी कोट्यावधी रुपये अकोला अर्बन बँकेतून कर्ज घेतले ते फेडले नाही. त्यामुळे आता पार्टनरशिप फर्म मध्ये इतर भागिदार यांचे घर सिल होत आहे. या सर्व कारवाईत काही घरांना सिल केले गेले. घरातल्या लहान बाळापासून सर्वांना पोलिस बंदोबस्त घराबाहेर काढले गेले. ही कारवाई करताना ज्याने हा सर्व उद्योग केला त्या मनोहर बापुराव चव्हाण यांचे घर मात्र या सिल कारवाईत सिल केले गेले नाही. ज्या भागिदारांना फसविले गेले त्यांचे घर सिल केले गेले त्यांना अक्षरशः घराबाहेर काढले गेले. लहान उमरी हा प्रकार समोर आला.

मुख्य तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांनी मलकापूर च्या सुधाकर डांगेकर, वनिता राने, गजानन राने, रजनी नहाटे व विवेक नहाटे, गोपाल शर्मा, राजेश धांडे, संतोष कवले, मारोती टिचकुले यांच्यापैकी काहींचे घर काल सिल केले आज लहान उमरी भागात सिलची कारवाई करताना मनोहर चव्हाण याचे घर सोडून इतर घरांचे सिल कारवाई सुरु असताना भेदभाव उघडकीस आला. त्यामुळे कोणाच्या लोनसाठी गरँटी देत असाल तर तुम्ही गॅरेंटर म्हणून फसविले तर जाणार नाही याची खात्री करा. त्याच बरोबर पॉर्टनरशिप फर्मसाठी घराचे कागदपत्रे मात्र कोणाला देऊ नका सावधान अन्यथा, कधी ही तुमच्यावर घर सिल झाल्यावर घराबाहेर राहण्याची पाळी येऊ शकते.

# देशी कट्टे तयार करणाऱ्या आरोपीकडून शस्त्रनिर्मितीचे साहित्य जप्त

## दहीहांडा पोलिसांची मोठी कारवाई; मध्यप्रदेशातून साहित्य हस्तगत

प्रतिनिधी ४ जून

**कुटासा :** पोलीस अधीक्षक अर्चित चांडक यांच्या आदेशानुसार राबविण्यात आलेल्या 'ऑपरेशन प्रहार' अंतर्गत स्थानिक गुन्हे शाखा, अकोला व पोलीस स्टेशन दहीहांडा यांनी संयुक्तरीत्या अवैध अग्निशस्त्र तस्करी व निर्मिती प्रकरणाचा पर्दाफाश केला आहे आहे.

दि. ३०/०४/२०२६ रोजी स्थानिक गुन्हे शाखेने मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार कारवाई करून दत्ता मोहोड व अक्षय मोहोड यांना ताब्यात घेतले. त्यांच्याकडून एक देशी कट्टा, जिवंत काडतूस तसेच पुढील चौकशीत शेख अकबर शेख हारूणङ याच्याकडून आणखी एक गावठी पिस्टल व जिवंत काडतूस जप्त करण्यात आले. या कारवाईत दोन गावठी पिस्टल, दोन जिवंत काडतुसे, मोटारसायकल व मोबाईल फोन असा एकूण २.२२ लाखांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला. पोलीस स्टेशन दहीहांडा येथे अप. क्र. ३२५/२५ कलम ३, २५ आर्म्स ॲक्ट अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.दाखल गुन्ह्याच्या तपासात दहीहांडा पोलिसांना महत्त्वपूर्ण यश मिळाले आहे. सदर गुन्ह्यातील आरोपी किस्मतसिंग तकदीरसिंग (रा. पाचोरी, जि. बुऱ्हाणपूर, मध्यप्रदेश) यास अटक करण्यात आली होती. तपासादरम्यान आरोपीकडून प्राप्त मोबाईल क्रमांकांच्या तांत्रिक विश्लेषणावरून तो पोलीस स्टेशन हठीन, जिल्हा पालवल (हरियाणा) येथील अप. क्र. १२४ / २६ कलम २५ ( ८ ) आर्म्स ॲक्ट या गुन्ह्यात निमका जेल, फरीदाबाद येथे न्यायालयीन कोठडीत असल्याची माहिती प्राप्त झाली. त्यानुसार दहीहांडा पोलिसांनी आरोपीस दि. ३०/०५/२०२६ रोजी निमका जेल, फरीदाबाद येथून ताब्यात घेऊन दि. ०१/०६/२०२६ ते ०३/०६/२०२६ पर्यंत पोलीस कोठडी रिमांड (इ्र्ण) प्राप्त केला. पोलीस कोठडीत सखोल चौकशी केली असता आरोपीने स्वतः देशी कट्टे (हत्यारे) तयार करत असल्याची कबुली दिली. तसेच त्याने आपल्या राहत्या ठिकाणाहून, रा. पाचोरी, जि. बुऱ्हाणपूर (मध्यप्रदेश) येथून शस्त्रनिर्मितीसाठी वापरण्यात येणारे साहित्य काढून दिले. त्यामध्ये खालील साहित्याचा समावेश आहे ग्लेंडर मशीन, लोखंडी कानस लोखंडी ब्लेड असलेले करवत लोखंडी छन्नी, लोखंडी मूठ असलेली हातोडी, लोखंडी सांडशीसदर साहित्य गुन्ह्यात जप्त करण्यात आले असून पुढील तपास सुरू आहे.ही कामगिरी पोलीस अधीक्षक अर्चित चांडक, अपर पोलीस अधीक्षक बी.चंद्रकांत रेड्डी तसेच सहा. पोलीस अधीक्षक अकोट निखिल पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस स्टेशन दहीहांडा ठाणेदार ढोले सागर कापसे, सोपान डाभेराव, पोहवा रवी डाभेराव, प्रदीप राऊत, माधव कोरे, सन्नी वाकोडे, विजय वागतकर, नवनाथ कोकाटे, त्यांच्या पथकाने यशस्वीरित्या पार पाडली.



# हिवरखेडसह आजुबाजूच्या गावांना फटका वादळी वाऱ्याने केळी पिके भुई सपाट



**हिवरखेड :** परिसरात सोमवारी सायंकाळी सहा वाजताच्या सुमारास मान्सूनपूर्व पावसाने हजेरी लावली. जोरदार वादळी वाऱ्यासह झालेल्या पावसामुळे अनेक गावांतील जनजीवन विस्कळीत झाले असून, वीजपुरवठाही वारंवार दीर्घकाळ खंडित झाला.

अचानक आलेल्या पावसामुळे विविध ठिकाणी वीज तारा तुटल्याच्या घटना घडल्या आहेत. अनेक गावांमध्ये वीजपुरवठा बंद झाला असून काही ठिकाणी झाडेही कोसळलेली आहेत. त्यामुळे नागरिकांना अडचणींचा सामना करावा लागला. महावितरणचे अधिकारी कर्मचारी अहोरात्र वीज पुरवठा सुरळीत करण्यासाठी घटनास्थळावर हजर होते. पावसाचा फटका शेतकऱ्यांनाही बसला असून केळी पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याची माहिती समोर आली आहे. वादळी वाऱ्यामुळे अनेक ठिकाणी केळीची झाडे जमीनदोस्त झाली आहेत.

**मालठाना खुर्द शेत शिवारातही केळी भुईसपाट**

हिवरखेड सह तेल्हारा तालुक्यातील आणि परिसरातील सर्वच गावांना अवकाळी वादळाचा तडाखा बसला असून बागायती आणि फळबाग धारक शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले आहे. वादळाचे पडसाद मालठाणा खुर्द शेत शिवारातही पहायला मिळाले. गोपाल रामराव हागे, सुनील गोविंदा दुधे, सूर्यभान शामराव हागे यासह अनेक शेतकऱ्यांच्या केळी बागा भुई सपाट झाल्या आहेत. त्यामुळे हिवरखेड सह तेल्हारा तालुक्यातील सर्वच बागायती शेतकऱ्यांना सरसकट मदत जाहीर करणे अत्यावश्यक आहे.

# बार्शिटाकळी रोडवर एसटी बसचा अपघात

**बार्शिटाकळी :** मंगरूळपीर आगाराची बस मंगरूळपीर ते अकोला अशी धावत असताना आळंदा आणि बार्शिटाकळी यांच्या मधात अपघात झाला. यामध्ये महामंडळाची बस एमएच ०७ सी ९४२१ या गाडीची मागची बाजू क्षतीग्रस्त झाली आहे. त्यामुळे महामंडळ बसचे नुकसान झाले आहे. सुदैवाने यात जीवीत हानी झाली नाही.



अकोल्यावरून एम एच २७ बी एक्स ५८५५ या क्रमांकाची जिप्सी गाडी अति वेगाने जात असताना महामंडळाची बसला मागून जोरदार धडक दिली. या जिप्सी गाडी पूर्णतः चकणाचुर झाली असून एसटी बसचेही नुकसान झाले आहे. अकोला ते बार्शीटाकळी हा रोड अरुंद असून या रोडवर एक दिवस आड अपघात होतात.या अपघाताकडे कोणत्याही अधिकारी कर्मचारी आरटीओ तसेच पोलीस प्रशासन यांचे लक्ष नाही. सध्या या मार्गावरूनच समृद्धी महामार्गावर जात येत असल्याने या रस्त्याने वाहनांची वर्दळ मोठ्या प्रमाणात वाढली आहे. या रोडवर अति वेगाने गाड्या धावत आहे. या गाड्याच्या वेगाने एक दिवस आड अपघात होत असून या रोडवर शासनाने गांभीर्याने लक्ष देऊन रुंद्रीकरण करावे, अशी नागरिकांची मागणी आहे.

# सुधाकरराव तराळे पाटील यांची राष्ट्रवादी काँग्रेस आध्यात्मिक वारकरी आघाडीच्या प्रदेश उपाध्यक्षपदी निवड

**पुण्यात आ. रोहित दादा पवार यांच्या हस्ते नियुक्तीपत्र देऊन सन्मान**

**अकोट :** राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या आध्यात्मिक वारकरी आघाडीच्या प्रदेश उपाध्यक्षपदी सुधाकर तराळे पाटील यांची नियुक्ती करण्यात आली.पुणे येथे आयोजित कार्यक्रमात आध्यात्मिक वारकरी आघाडीचे अध्यक्ष दत्ता महाराज दोन्हे यांच्या उपस्थितीत नेते आमदार रोहित दादा पवार यांच्या हस्ते नियुक्ती पत्र देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला.आमदार रोहित दादा पवार बोलताना म्हणाले सुधाकर तराळे यांची नियुक्ती म्हणजे समुद्रातील शिंपले शोधण्यासारखे आहे.सुधाकर तराळे पाटील हे अकोला जिल्ह्यातील अकोट तालुक्यातील एदलापूर येथील सुपुत्र असून व्यवसायानिमित्त पुणे येथे वास्तव्यास आहेत.सामाजिक, धार्मिक व आध्यात्मिक क्षेत्रातील त्यांच्या कार्याची दखल घेत पक्षाने त्यांच्यावर ही महत्त्वाची जबाबदारी सोपविली आहे.या नियुक्तीमुळे कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून, तराळे पाटील यांच्या नेतृत्वाखाली आध्यात्मिक वारकरी आघाडी अधिक सक्षमपणे कार्य करेल, असा विश्वास उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केला.यावेळी उपस्थित पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी सुधाकर तराळे पाटील यांचे अभिनंदन करुन पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.



# वरूर जऊळका ते पंढरपूर पायदळ दिंडी सोहळ्याचे आयोजन

प्रतिनिधी ४ जून

**अकोट :** संत नगरी वरुर जऊळका योग योगेश्वर संस्थान संत गजानन महाराज मंदिर ते महाक्षेत्र पंढरपूर पादळ पालखी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे .

योग योगेश्वर संस्थान मधील संत गजानन महाराजांच्या मुखवटा व पादुका या पायदळ दिंडी सोहळ्याने यावर्षीपासून पंढरपूर येथे नेण्याचे आयोजन करण्यात आले असून २० जून तारखेला दिंडी सोहळ्याचे प्रस्थान आहे दिंडी प्रस्थानाला सकाळी दहा ते बारा वाजेपर्यंत ह भ प मोहन म. मेतकर यांचे कीर्तन होईल दिंडी प्रस्थानाला बाहेरगावा वरुन येणाऱ्या भाविकांना विदर्भ गाथा पारायण समिती च्या वतीने महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे महाप्रसादा नंतर लगेच दुपारी दोन वाजता दिंडीचे प्रस्थान होईल व श्रींच्या पालखी सोहळ्याला निरोप देण्याकरता पंचक्रोशीतील सर्व भक्तांची मांदीआळी जमणार आहे पायदळ दिंडी सोहळ्यामध्ये जे वारकरी सहभागी होणार आहेत त्यांच्या जवळून दिंडीमध्ये सहभागी होण्याकरता व पंढरपूर येथे मुक्कामाचे ठिकाणी राहण्याकरता कुठल्याही प्रकारची फी स्वीकारली जाणार नाही. अरुण म. लांडे, वासुदेव म.खोले गुरुजी यांच्या आशीर्वादाने दिंडी सोहळ्याची सुरुवात होईल.



# प्रमोद लहाने यांची केंद्रीय मानव अधिकार सुरक्षा संघटनपदी नियुक्ती



प्रतिनिधी ४ जून

**अकोट :** तालुक्यामधील वडाळी देशमुख येथील राजकीय व सामाजिक बांधील की जपणारे समाजकार्यात नेहमीच पुढाकारात अग्रेसर असणारे तसेच बागायतदार शेतकरी फळ अनेक प्रकारचे स्वबळावर भरगच्च उत्पादन निर्माण करणारे समाजकार्यात सक्रिय कार्यकर्ते समाजसेवक अशी त्यांची ओळख आहे प्रमोद लहाने यांची शिवशंकर घाटोळे केंद्रीय मानव अधिकार सुरक्षा संघटन, दिल्ली यांच्या अकोला जिल्हा अध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. ही निवड राष्ट्रीय अध्यक्ष तेजकरण चव्हाण यांच्या आदेशानुसार महाराष्ट्र राज्य सचिव रवींद्र खेडकर यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच विदर्भ अध्यक्ष अभय व्यास यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आली. यावेळी वि. उपाध्यक्ष देवेंद्र पुनकर, वि. सचिव अनिल गुप्ता, वि. संघटक प्र प्रभाकर कुलट यांच्या सहमतीने ही नियुक्ती जाहीर करण्यात आली.

या निवडीमुळे प्रमोद लहाने यांच्यावर अकोला जिल्ह्यात संघटनेची जबाबदारी सोपविण्यात आली असून विविध स्तरातून त्यांचे अभिनंदन वर्षाव होत आहे.अनेक सामाजिक संस्थांशी त्यांचा जवळचा संबंध असून विविध सामाजिक उपक्रमांमध्ये त्यांचा नेहमीच सहभाग असतो. त्यांच्या निवडीमुळे संघटनेच्या कार्याला जिल्ह्यात अधिक बळ मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे. रवींद्र खेडकर, अभय व्यास, अनिल गुप्ता, प्रभाकर कुलट, प्रमोद लहाने, अशोक अमोल बोबडे, गजानन चराटे, शिवशंकर घाटोळे उपस्थित होते.

कार्यक्रमादरम्यान नियुक्तीपत्र प्रदान करून मान्यवरांचा सत्कार करण्यात आला.

# शहरात मोकाट गायींच्या चोरीचे वाढते प्रमाण; नागरिकांमध्ये संताप

**मुर्तीजापूर :** शहरात मोकाट तसेच संगोपनासाठी ठेवण्यात आलेल्या गायींच्या चोरीच्या घटनांमध्ये वाढ होत असल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. गेल्या काही वर्षांपासून हा प्रकार सुरू असून, संबंधित प्रकरणांकडे गांभीर्याने लक्ष देण्याची मागणी शहरवासीयांकडून होत आहे.

शहरात मोठ्या प्रमाणावर मोकाट गायींचा वावर असून अनेक नागरिक त्यांना चारा-पाणी देत संगोपन करतात. हिंदू संस्कृतीमध्ये गायीला विशेष स्थान असल्याने अनेक महिला व नागरिक श्रद्धेने गोपूजन करतात. मात्र काही समाजकंटक या भावनेचा गैरफायदा घेत गायींची चोरी करत आहे मात्र याकडे पोलीस दुर्लक्ष करित आहेत.

गाय चोरी झाल्यानंतर तक्रार देण्यासाठी पोलीस ठाण्यात गेल्यास अनेकदा केवळ 'मिसिंग' म्हणून नोंद केली जाते, त्यामुळे चोरीच्या घटनांचा तपास प्रभावीपणे होत नसल्याची खंत गायींचे संगोपन करणाऱ्या नागरिकांनी व्यक्त केली आहे. मागील तीन-चार वर्षांपासून शहरात अशा घटना सातत्याने घडत असून, चोरीला गेलेल्या गायींचा शोध लावण्यात यश मिळत नसल्याचेही सांगण्यात येत आहे. या संदर्भात अनेक वेळा नागरिकांनी पोलीस प्रशासनाची भेट घेऊन आपली व्यथा मांडली आहे. मात्र अद्याप ठोस उपाययोजना किंवा आरोपींचा शोध लागलेला नसल्याने नागरिकांमध्ये असंतोषाचे वातावरण आहे.

शहरातील नागरिकांनी जिल्हा पोलीस अधीक्षक अर्चित चांडक यांनी या प्रकरणात विशेष लक्ष घालून गाय चोरी करणाऱ्या टोळ्यांचा शोध घ्यावा, आरोपींवर कठोर कारवाई करावी आणि गायींच्या मालकांना न्याय मिळवून द्यावा, अशी मागणी केली आहे. तसेच शहरात रात्रीची गस्त वाढवून आणि संवेदनशील भागांमध्ये सीसीटीव्ही यंत्रणा बळकट करून चोरीच्या घटनांवर आळा घालावा, अशी अपेक्षाही व्यक्त करण्यात येत आहे.



## निधनवार्ता

**उषा साहेबराव भुस्कट**



**अकोट :** येथील प्रतिष्ठित नागरिक सचिन भुस्कट यांच्या काकू उषा साहेबराव भुस्कट यांची वयाच्या ५८ वर्षी अल्पशा आजाराने राहत्या घरी दि.२९ निधन झाले त्यांच्या पक्षात एक मुलगी असा परिवार आहे.

# सरिता वाकोडे यांनी शिवसेनेच्या समाज कार्यावर मिळवली पीएचडी

प्रतिनिधी ४ जून

**अकोला :** हिंदूहृदय सम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी १९ जून १९६६ रोजी मराठी माणसाच्या न्याय हक्कासाठी स्थापन केलेल्या शिवसेनेवर ६० वर्षांनी पीएचडी मिळवण्याचा बहुमान शिवसेनेच्या ( उबाठा ) अकोला जिल्हा महिला संघटिका सौ. सरिता विजय वाकोडे यांनी मिळविला आहे.




अमरावती येथील संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाला सौ. सरिता वाकोडे यांनी ' शिवसेनेच्या मानवतावादी कार्याचे ऐतिहासिक अध्ययन : विशेष संदर्भ, मुंबई विभाग ( कालखंड ई. स. १९६० ते २०१९ ) हा प्रबंध सादर केला होता. या प्रबंधाचा स्वीकार करून अमरावती विद्यापीठाच्या उपकुलसचिव सौ. मीनल मालधुरे यांनी सौ. सरिता वाकोडे यांना पीएचडीचे प्रमाणपत्र सन्मानपूर्वक प्रदान केले. हा सन्मान प्रदान करते समयी व्यवसायाने शिक्षक असलेले त्यांचे पती विजय वाकोडे आवर्जून उपस्थित होते.

सरिता वाकोडे या शिवसेनेवर डॉक्टरेट मिळविणाऱ्या पहिल्या महिला ठरल्या असून त्यांच्या या कामगिरीबद्दल शिवसेना ( उबाठा ) चे प्रमुख तथा माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी मुंबई येथे त्यांचा सत्कार केला. आमदार नितीन देशमुख यांनी त्यांचे अभिनंदन केले.


पाटील समाजातील महिलेच्या कामगिरीबद्दल पाटील समाजाचे अध्यक्ष अशोकराव अमानकर तथा सचिव प्रदीप खाडे व इतरही पदाधिकाऱ्यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

## निधनवार्ता

**रामराव जगनाडे**



**अकोट :** अंजनगाव तालुक्यातील काळगव्हाण येथील ज्येष्ठ व प्रतिष्ठित नागरिक रामराव किसनराव जगनाडे यांचे ४ जून रोजी सकाळी हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. मृत्युसमयी ते ८१ वर्षांचे होते. गावातील ज्येष्ठ मार्गदर्शक व्यक्तिमत्त्व हरपल्याची भावना ग्रामस्थांमध्ये व्यक्त होत आहे.त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, एक मुलगी तसेच नातवंड, असा आप्तपरिवार आहे.रामराव जगनाडे यांच्यावर आज सायंकाळी ५ वाजता काळगव्हाण येथील शेतात अंतिम संस्कार करण्यात येणार आहेत.



सिटी न्यूज सुपरफास्ट यवतमाळ
गुरुवार, दि. ४ जून २०२६
https://epaper.citynewssuperfast.com

# साहेबराव कांबळे यांची माघार, आता भुतडा यांच्या भूमिकेकडे लक्ष

प्रतिनिधी ४ जून

**यवतमाळ** : यवतमाळ स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघाच्या विधानपरिषद निवडणुकीत महाविकास आघाडीचे उमेदवार साहेबराव कांबळे यांनी आपला उमेदवारी अर्ज मागे घेतला आहे. बुधवारी त्यांनी निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांकडे नियमानुसार अर्ज सादर करून उमेदवारी मागे घेतल्याची माहिती मिळाली.

या निवडणुकीत महाविकास आघाडीकडून साहेबराव कांबळे, महायुतीकडून दुष्यंत चतुर्वेदी तसेच भाजपचे जिल्हा समन्वयक नितीन भुतडा यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला होता. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या मर्यादित मतदारसंख्येच्या या निवडणुकीत मतांचे गणित अत्यंत महत्त्वाचे मानले जात आहे.

साहेबराव कांबळे यांनी उमेदवारी मिळाल्यानंतर जोरदार प्रचार मोहीम राबविली होती. मात्र उपलब्ध मतसंख्येचा आणि राजकीय परिस्थितीचा आढावा घेतल्यानंतर त्यांनी निवडणुकीतून माघार घेण्याचा निर्णय घेतल्याचे सांगितले जात आहे. त्यांच्या या निर्णयामुळे निवडणुकीच्या राजकीय समीकरणांमध्ये महत्त्वाचा बदल झाला आहे.

दरम्यान, भाजपचे नितीन भुतडा यांच्या उमेदवारीबाबतही राजकीय वर्तुळात चर्चा सुरू आहे. भुतडा यांनी यापूर्वीच वरिष्ठ पक्षनेत्यांच्या आदेशानुसार उमेदवारी अर्ज दाखल केल्याचे स्पष्ट केले असून, पक्ष नेतृत्वाने निर्देश दिल्यास उमेदवारी मागे घेण्यासही आपण तयार असल्याचे त्यांनी म्हटले आहे.

मुंबई येथे पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांची महत्त्वाची बैठक पार पडत असल्याने त्यानंतर नितीन भुतडा यांच्या भूमिकेबाबत चित्र स्पष्ट होण्याची शक्यता आहे.

जर भुतडा यांनी उमेदवारी कायम ठेवली, तर त्यांच्यात आणि महायुतीचे उमेदवार दुष्यंत चतुर्वेदी यांच्यात चुरशीची लढत होण्याची शक्यता राजकीय निरीक्षक व्यक्त करीत आहेत.



आता नितीन भुतडा यांची पुढील भूमिका काय राहते आणि युतीधर्माला प्राधान्य दिले जाते की मैत्रीपूर्ण लढत पाहायला मिळते, याकडे जिल्ह्याचे राजकीय लक्ष लागले आहे.

## 'साहेबराव काबळेंनी काँग्रेसच्या पाठीत खंजीर खुपसला'

प्रतिनिधी ४ जून

**यवतमाळ** : विधान परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर काँग्रेसमध्ये अंतर्गत मतभेद उफाळून आले असून, पक्षाचे जिल्हाध्यक्ष सचिन नाईक यांनी साहेबराव काबळे यांच्यावर गंभीर आरोप केला आहे. पक्षाने उमरखेड विधानसभा मतदारसंघातून तसेच नंतर विधान परिषदेसाठी उमेदवारी देऊनही काबळे यांनी ऐनवेळी उमेदवारी मागे घेतल्याने पक्षाच्या पाठीत खंजीर खुपसल्याचा आरोप नाईक यांनी केला. नाईक म्हणाले, उमरखेड विधानसभा मतदारसंघ अनुसूचित जातीसाठी राखीव असताना काँग्रेसने साहेबराव काबळे यांच्यावर विश्वास ठेवून उमेदवारी दिली होती. त्या निवडणुकीत त्यांचा पराभव झाला. त्यानंतरही पक्षाने त्यांच्यावर विश्वास कायम ठेवत विधान परिषद निवडणुकीसाठी उमेदवारी दिली आणि त्यांनी नामांकनही दाखल केले होते. मात्र, पक्षश्रेष्ठींशी कोणतीही चर्चा न करता काबळे यांनी ऐनवेळी उमेदवारी मागे घेतली. त्यामुळे पक्ष कार्यकर्त्यांमध्ये नाराजी असून, हा निर्णय पक्षनिष्ठेला धक्का देणारा असल्याचे नाईक यांनी म्हटले आहे. या घडामोडींमुळे जिल्ह्यातील काँग्रेसच्या राजकारणात नव्या चर्चांना उधाण आले असून, आगामी काळात पक्ष नेतृत्व याबाबत काय भूमिका घेते याकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

# घरोघरी जनगणना, प्रत्यक्ष पडताळणीसाठी जिल्हाधिकारी मैदानात



प्रतिनिधी ४ जून

**यवतमाळ** : जिल्ह्यात सुरू असलेल्या जनगणनेच्या कामाची जिल्हाधिकारी विकास मीना यांनी चौसाळा परिसरात प्रत्यक्ष पाहणी केली. यावेळी त्यांनी घरांना भेटी देऊन प्रगणकांकडून नोंदविण्यात येणाऱ्या माहितीची पडताळणी केली तसेच क्षेत्रातील अडचणींचा आढावा घेतला.

जनगणना प्रक्रियेत प्रगणक आणि पर्यवेक्षक घरोघरी जाऊन कुटुंब व नागरिकांची माहिती डिजिटल पद्धतीने नोंदवत आहेत. सन २०११ नंतर तब्बल १५ वर्षांनी होत असलेल्या जनगणनेच्या पार्श्वभूमीवर या कामाची प्रगती जाणून घेण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष भेट दिली.

यावेळी त्यांनी नागरिकांनी जनगणनेसाठी खरी व अचूक माहिती देऊन सहकार्य करावे, असे आवाहन केले. तसेच कामकाजादरम्यान उद्भवणाऱ्या अडचणी समन्वयातून सोडविण्याच्या सूचना प्रगणक व पर्यवेक्षकांना दिल्या.

जनगणनेच्या पहिल्या टप्प्यात घर, कुटुंबातील भौतिक सुविधा आणि मालमत्तेशी संबंधित माहिती संकलित केली जात आहे. १ ते १५ मे या कालावधीत ऑनलाइन स्व-गणना केलेल्या नागरिकांना प्राप्त झालेला 'युनिक आयडी' प्रगणकांना सादर करावा लागणार आहे. तर ऑनलाइन माहिती न भरलेल्या नागरिकांची माहिती प्रगणकांकडून घरभेटीद्वारे डिजिटल उपकरणांवर नोंदविली जात आहे.

पहिल्या टप्प्याचे काम १४ जूनपर्यंत पूर्ण होणार असून लोकसंख्या गणनेचा पुढील टप्पा फेब्रुवारी २०२७ मध्ये राबविण्यात येणार आहे.

या पाहणीवेळी तहसीलदार विद्या शिंदे, प्रगणक आणि पर्यवेक्षक उपस्थित होते.

# अर्धवट पुलामुळे शेतकरी व ग्रामस्थांची चिंता वाढली

प्रतिनिधी ४ जून

**पाटणबोरी** : झरी जामणी तालुक्यातील मांडवी गावाजवळील बिब्याच्या नाल्यावरील पुलाचे काम अद्याप अर्धवट अवस्थेत असल्याने परिसरातील शेतकरी व ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. झरी जामणीकडे जाणाऱ्या मार्गावरील महत्त्वाच्या तीन पुलांना मंजुरी मिळून वर्षभर उलटून गेले असून कामाला सुरुवात झाली असली तरी काही ठिकाणी कामे अद्याप पूर्ण झालेली नाहीत.

चाटवणजवळील बिब्याच्या नाल्यावरील पुलाचे बांधकाम पूर्ण झाले असले तरी पुलाच्या दोन्ही बाजूंना आवश्यक असलेली मुरूम भरावाची



कामे अद्याप करण्यात आलेली नाहीत. त्यामुळे पिवरडोल, गवारा, लांडगी, माथार्जून आदी गावांतील नागरिकांसह शेतकऱ्यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.

पावसाळ्याची सुरुवात होत असताना पुलाच्या दोन्ही बाजू सुरक्षितपणे जोडल्या नसल्याने वाहतुकीचा प्रश्न गंभीर बनला आहे. शेतकऱ्यांना खत, बियाणे व शेतीसाठी लागणारे साहित्य शेतापर्यंत पोहोचविणे कठीण होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. तसेच हा मार्ग बंद राहिल्यास शेतीची कामेही प्रभावित होऊ शकतात, अशी चिंता शेतकरी व्यक्त करीत आहेत.

ग्रामस्थांच्या मते, पुलाच्या कामात मुरमाऐवजी रेतीचा वापर करण्यात येत असल्याचा संशय असून त्यामुळे पुलाच्या टिकाऊपणाबाबतही प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. कामात निकृष्ट दर्जाचे साहित्य वापरले जात असल्यास त्याची चौकशी करून संबंधितांवर कारवाई करावी, अशी मागणी होत आहे. दरम्यान, संबंधित सार्वजनिक बांधकाम विभागाने या प्रकरणाची तातडीने दखल घेऊन पुलाच्या दोन्ही बाजूंचे रखडलेले काम पूर्ण करावे, रस्ता वाहतुकीसाठी खुला करावा तसेच कामातील संभाव्य भ्रष्टाचाराची चौकशी करावी, अशी मागणी परिसरातील नागरिक व शेतकरी वर्गाकडून करण्यात येत आहे.

# मोटारसायकल चोरी करणाऱ्या दोघांना अटक

प्रतिनिधी ४ जून

**यवतमाळ** : शहरातील मोटारसायकल चोरीच्या गुन्ह्याचा अवघ्या काही तासांत छडा लावत यवतमाळ शहर पोलिसांच्या डी.बी. पथकाने दोन आरोपींना अटक केली. त्यांच्या ताब्यातून चोरीची मोटारसायकलसह आणखी दोन दुचाकी असा एकूण १ लाख ११ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

याप्रकरणी फिर्यादी अंकज बाबुराव आबाळे यांनी २ जून रोजी यवतमाळ शहर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली होती. त्यांची हिरो होंडा फॅशन प्लस (क्र. एमएच २९ एक्स ८२६९) ही मोटारसायकल शासकीय रुग्णालय



परिसरातून अज्ञात चोरट्याने लंपास केली होती. यावरून पोलिसांनी गुन्हा क्रमांक ४४२/२०२६, कलम ३०३(२) बीएनएस २०२३ अंतर्गत गुन्हा दाखल करून तपास सुरू केला.

गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलीस निरीक्षक रामकृष्ण जाधव यांनी डी.बी. पथकाला आरोपींचा शोध घेण्याच्या सूचना दिल्या. तपासादरम्यान सीसीटीव्ही फुटेजची पडताळणी तसेच गोपनीय माहितीच्या आधारे आयुष दया सगोज (वय २२) आणि प्रेम गौतम मेश्राम (वय २१, दोघेही रा. अशोकनगर, यवतमाळ) यांनी संगनमताने चोरी केल्याचे निष्पन्न झाले.

पोलिसांनी चापडोह चौफुली परिसरात सापळा रचून दोघांना ताब्यात घेतले. त्यांच्या ताब्यातून चोरीस गेलेली हिरो होंडा स्प्लेंडर (किंमत २६ हजार रुपये), हिरो डिलक्स (किंमत ६० हजार रुपये) आणि विनानंबर बजाज डिस्कव्हर (किंमत २५ हजार रुपये) अशा तीन दुचाकी जप्त करण्यात आल्या.

ही कारवाई पोलीस अधीक्षक कुमार चिंता, अपर पोलीस अधीक्षक अशोक थोरात, उपविभागीय पोलीस अधिकारी दिनेश बैसाने आणि पोलीस निरीक्षक रामकृष्ण जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

कारवाईत पोलीस उपनिरीक्षक गणेश सपकाळ, पोलीस हवालदार रावसाहेब शेंडे, किरण पडघण तसेच गौरव ठाकरे, पवन नांदेकर, पवन तडसे, प्रदीप कुरडकर, मयूर तेल्लेवार आणि चंद्रशेखर जाधव यांनी सहभाग घेतला.

# यवतमाळ पोलीस दलात फेरबदल; ११ पोलीस अधिकाऱ्यांच्या बदल्या

प्रतिनिधी ४ जून

**यवतमाळ** : जिल्हा पोलीस आस्थापना मंडळाच्या शिफारशीनुसार यवतमाळ जिल्हा पोलीस दलातील ११ पोलीस अधिकाऱ्यांच्या प्रशासकीय कारणास्तव बदल्या व नव्या नेमणुका करण्यात आल्या आहेत. यासंदर्भातील आदेश पोलीस अधीक्षक कुमार चिंता यांनी जारी केला आहे.

### प्रमुख बदल्या

- धनराज निळे : कळंब -महागाव (ठाणेदार), भानुदास पिदुरकर : नियंत्रण कक्ष - वणी (ठाणेदार), गोपाल उंबरकर : वणी - आर्थिक गुन्हे शाखा, अजित कदम : नियंत्रण कक्ष - अवधूतवाडी (ठाणेदार), नंदकिशोर काळे : अवधूतवाडी - डायल-११२, नरेश रणधीर : नियंत्रण कक्ष - वाहतूक उपशाखा, वणी, सुनिल नाईक : यवतमाळ ग्रामीण - जिल्हा विशेष शाखा, अनिल पवार : नियंत्रण कक्ष - जिल्हा विशेष शाखा, प्रकाश तायडे : सायबर - वाहतूक उपशाखा, पांढरकवडा, अमोल राठोड : महागाव - स्थानिक गुन्हे शाखा, सागर इंगळे : उमरखेड - स्थानिक गुन्हे शाखा

बदल्यांमध्ये कळंबचे पोलीस निरीक्षक धनराज निळे यांची महागाव पोलीस ठाण्याच्या ठाणेदारपदी नियुक्ती करण्यात आली आहे. तर पोलीस नियंत्रण कक्षातील भानुदास पिदुरकर यांची वणी पोलीस ठाण्याच्या ठाणेदारपदी नियुक्ती झाली आहे. वणीचे ठाणेदार गोपाल उंबरकर यांची आर्थिक गुन्हे शाखेच्या प्रभारी अधिकारीपदी बदली करण्यात आली आहे.

अवधूतवाडी पोलीस ठाण्याच्या ठाणेदारपदी पोलीस निरीक्षक अजित कदम यांची नियुक्ती करण्यात आली असून, विद्यमान ठाणेदार नंदकिशोर काळे यांना डायल-११२ विभागाची जबाबदारी देण्यात आली आहे. पोलीस नियंत्रण कक्षातील नरेश रणधीर यांची जिल्हा वाहतूक उपशाखा वणी येथे नियुक्ती करण्यात आली आहे.

यवतमाळ ग्रामीण पोलीस ठाण्याचे ठाणेदार सुनिल नाईक यांची जिल्हा विशेष शाखा (सुरक्षा शाखा) येथे प्रभारी अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. तसेच पोलीस नियंत्रण कक्षातील अनिल पवार यांची जिल्हा विशेष शाखेच्या प्रभारी अधिकारीपदी नियुक्ती झाली आहे.

सायबर पोलीस ठाण्यातील सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रकाश तायडे यांची जिल्हा वाहतूक उपशाखा पांढरकवडा येथे बदली करण्यात आली आहे.

महागावचे पोलीस उपनिरीक्षक अमोल राठोड आणि उमरखेडचे पोलीस उपनिरीक्षक सागर इंगळे यांची स्थानिक गुन्हे शाखेत नियुक्ती करण्यात आली आहे.

पोलीस अधीक्षकांनी सर्व संबंधित अधिकाऱ्यांना तात्काळ नव्या नेमणुकीच्या ठिकाणी हजर होण्याचे निर्देश दिले आहेत.

तसेच प्रलंबित गुन्हे, तपास, अकस्मात मृत्यू व अर्ज चौकशी संदर्भातील कागदपत्रे संबंधितांकडे हस्तांतरित करण्याचे आदेशही देण्यात आले आहेत.

# सावळी येथे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जयंती उत्साहात साजरी

प्रतिनिधी ४ जून

**सावळी सदोबा** : पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीनिमित्त सावळी येथे विविध धार्मिक व सामाजिक कार्यक्रमांचे आयोजन करून जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. यानिमित्त काढण्यात आलेल्या भव्य रॅलीत गावकरी, समाजबांधव तसेच बाहेरगावाहून आलेल्या नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला.

आज सकाळी आठ वाजता गावचे सरपंच बाळासाहेब शिंदे यांच्या निवासस्थानापासून रॅलीला प्रारंभ करण्यात आला. पिवळे झेंडे दाखवून रॅलीचे उद्घाटन करण्यात आले. रॅलीत महिला, युवक आणि ज्येष्ठ नागरिकांचा उत्स्फूर्त सहभाग होता. यावेळी ट्रॅक्टरवर पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचा भव्य पुतळा ठेवण्यात आला होता. हरिपाठ मंडळांनी सादर केलेल्या नेत्रदीपक देखाव्यांमुळे संपूर्ण परिसर भक्तिमय वातावरणाने भारावून गेला होता. रॅलीदरम्यान विविध महामानवांच्या पुतळ्यांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. रॅली शिवाजी चौकात पोहोचल्यानंतर तेथे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या तैलचित्राचे पूजन व आरती करण्यात आली. त्यानंतर उपस्थितांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले. यावेळी मान्यवरांनी अहिल्यादेवी होळकर यांच्या कार्याचा व जीवनचरित्राचा आढावा घेत त्यांच्या आदर्शांवर प्रकाश टाकला. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी समाजातील युवकांनी विशेष परिश्रम घेतले. जयंती सोहळा उत्साह, भक्तीभाव आणि सामाजिक एकोप्याच्या वातावरणात संपन्न झाला.



# दिपक देवतळे यांना 'नानकचंद रत्तू' पुरस्कार




प्रतिनिधी ४ जून

**आर्णी** : येथील सामाजिक कार्यकर्ते दिपक देवतळे यांना विविध क्षेत्रांतील सामाजिक योगदानाबद्दल डॉ. बाबासाहेब आंबेडकर धम्म प्रशिक्षण अभियानातर्फे प्रदान करण्यात येणाऱ्या सन २०२६ च्या 'नानकचंद रत्तू' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

यवतमाळ तालुक्यातील चापर्डा येथील ज्ञानभूमीवर आयोजित पाच दिवसीय निवासी सामनेर व अनागरिक/अनागरिका प्रशिक्षण शिबिराच्या समारोपीय कार्यक्रमात हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. अभियानाच्या उपाध्यक्षा पपीताताई मनोहरे यांच्या हस्ते देवतळे यांना सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अमोल भगत (नागपूर) होते. यावेळी डॉ. बोधी अशोक, अभियान प्रमुख जगदीश शिंदे, रमेश जीवणे, गजानन किनाके, डॉ. प्रशांत तामगाडगे, उद्धराव भालेराव, डॉ. अमोल श्रीरामे, प्रा. इंदुताई नारनवरे, ज्योती नाखले, मृदुलताताई हेरोडे, ज्योतीताई मेश्राम, उत्तम श्रीरामे, अरविंद बोरकर, राजेंद्र रामटेके, बंडूभाऊ ढोणे, बंडूभाऊ आठवले यांच्यासह शिबिरार्थी व अनुयायी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दिपक देवतळे यांच्या या सन्मानाबद्दल आर्णी परिसरातील सामाजिक, धार्मिक व आंबेडकरी चळवळीतील कार्यकर्त्यांकडून त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

# दारव्ह्यात इंधनटंचाई; बहुजन मुक्ती पार्टीचा आंदोलनाचा इशारा

प्रतिनिधी ४ जून

**इंधनटंचाईमुळे वाढल्या अडचणी**
**पेट्रोल पंपांवर इंधनाचा तुटवडा**
**शेतकरी व ट्रॅक्टर चालकांना फटका**
**वाहतूक व दैनंदिन कामकाजावर परिणाम**
**बहुजन मुक्ती पार्टीची तातडीने उपाययोजनांची मागणी**
**समस्या न सुटल्यास आंदोलनाचा इशारा**

**दारव्हा** : शहरातील अनेक पेट्रोल पंपांवर पेट्रोल व डिझेलचा तुटवडा निर्माण झाल्याने नागरिक, शेतकरी आणि वाहनधारकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. खरीप हंगामाच्या तोंडावर निर्माण झालेल्या या परिस्थितीमुळे संताप व्यक्त होत असून बहुजन मुक्ती पार्टीने प्रशासनाला आंदोलनाचा इशारा दिला आहे.

शहरातील अनेक पेट्रोल पंपांवर 'पेट्रोल उपलब्ध नाही' आणि 'डिझेल उपलब्ध नाही' अशा सूचना लावण्यात आल्या आहेत. त्यामुळे इंधनासाठी येणाऱ्या नागरिकांना रिकाम्या हाताने परत जावे लागत आहे. विशेषतः शेतातील मशागतीची कामे सुरू असल्याने शेतकरी व ट्रॅक्टर चालकांना या टंचाईचा फटका बसत आहे.

बहुजन मुक्ती पार्टीचे यवतमाळ-वाशिम लोकसभा अध्यक्ष बिमोद मुधाने यांनी प्रसिद्धीस दिलेल्या निवेदनात इंधनटंचाईबाबत तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. नागरिक, शेतकरी आणि वाहनधारकांची गैरसोय तातडीने दूर करून इंधनपुरवठा सुरळीत करावा,




अशी मागणी त्यांनी केली.

प्रशासनाने या समस्येकडे दुर्लक्ष केल्यास नागरिकांना सोबत घेऊन तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही पक्षाच्या वतीने देण्यात आला आहे.

# बाभुळगाव बसस्थानकावर हजारो लिटर पाणी वाया

प्रतिनिधी ४ जून

**बाभुळगाव** : जिल्हा वार्षिक नाविन्यपूर्ण योजनेअंतर्गत बाभुळगाव बसस्थानकावर प्रवाशांसाठी शुद्ध व थंड पिण्याच्या पाण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. मात्र या सुविधेतील पाण्याचा निचरा होण्यासाठी आवश्यक आउटलेटची व्यवस्था न केल्याने दररोज हजारो लिटर पाणी वाया जात असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे सार्वजनिक निधीच्या वापराबाबत प्रश्न उपस्थित केले जात आहेत.

बसस्थानकाच्या एका कोपऱ्यात सुमारे १३ लाख ३० हजार रुपये खर्चून



ही सुविधा उभारण्यात आली. परंतु पाण्याचा योग्य निचरा होत नसल्यामुळे शुद्ध व थंड पाणी सतत वाहत असून त्याची मोठ्या प्रमाणात नासाडी होत आहे. विशेष म्हणजे तालुक्यातील अनेक गावांमध्ये पिण्याच्या पाण्याची समस्या असताना बसस्थानकावर पाणी वाया जात असल्याने नागरिकांनी नाराजी व्यक्त केली आहे.

वाहणाऱ्या पाण्यामुळे बसस्थानक परिसरात चिखल साचला असून प्रवाशांना त्यातून मार्ग काढावा लागत आहे. स्थानिक नागरिकांनी ही बाब कंत्राटदाराच्या निदर्शनास आणून दिली असता त्याकडे दुर्लक्ष करण्यात आल्याचा आरोप केला जात आहे.

दरम्यान, हे काम आर्थिक वर्षाच्या अखेरीस घाईगडबडीत पूर्ण करण्यात आल्याची चर्चा असून बांधकामाच्या गुणवत्तेबाबतही प्रश्न उपस्थित होत आहेत. ग्रामीण पाणीपुरवठा यांत्रिकी उपविभाग आणि राज्य परिवहन महामंडळाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी तातडीने बसस्थानकाची पाहणी करून पाण्याची होणारी नासाडी थांबवावी व संबंधितांवर कारवाई करावी, अशी मागणी प्रवासी व सुज्ञ नागरिकांकडून करण्यात येत आहे.

सिटी न्यूज अमरावती

गुरुवार, दि. ४ जून २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

# कुऱ्हा पोलिसांनी पकडली ८४ हजारांची गावठी दारू

**कुऱ्हा :** स्थानिक पोलिसस्टेशनच्या हद्दीत माळेगाव शिवारातील बोरनदीच्या काठावर गावठी दारूची निर्मिती सुरू असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती.

या माहितीवरून पोलिसांनी धाड टाकून आरोपी देविदास अवधुत उके रा. माळेगाव याला ताब्यात घेतले आहे. त्याच्याकडून ४८ पिंपे मोहा सडवा, ३०० लीटर हातभट्टीची दारू व इतर साहित्य असा एकूण ८४ हजार ३०० रुपयांचा मुद्देमाल ताब्यात घेण्यात आला.

ही कारवाई पोलिस अधीक्षक निकेतन कदम, अप्पर पोलिस अधीक्षक तोटेवाड, एसडीपीओ थोरात यांच्या मार्गदर्शनात कुऱ्हा पोलिसस्टेशनचे स.पो.नि. अमोल तुळजेवार, पीएसआय विलास थुल, पोहेकॉ सपना निरगुळे, अनिल निंघोट, पो. कॉ. सागर निमकर, हेमंत डहाके यांच्या पथकाने केली.



आमदार रवि राणा आणि माजी खासदार नवनीत राणा यांनी बुधवारी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची वर्षा निवासस्थानी १ तास भेट घेऊन राजकीय आणि विकासात्मक कामावर चर्चा केली.

# प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेत महाराष्ट्र देशात टॉपर

प्रतिनिधी ४ जून

**अमरावती:** छतावर सौरऊर्जा निर्मिती प्रकल्प बसवून घरगुती ग्राहकांचे वीजबिल शून्य करण्याच्या प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेत दि. २९ मे रोजी देशात आतापर्यंतचे एका दिवसातील सर्वाधिक १५ हजार घरांवर प्रकल्प बसविण्यात आले असून त्यापैकी ४,७०० घरांवर सौरऊर्जा प्रकल्प बसवून महाराष्ट्राने प्रथम क्रमांक मिळविला. या यशाबद्दल केंद्रीय नवीकरणीय ऊर्जामंत्री प्रल्हाद जोशी यांनी महाराष्ट्राचे अभिनंदन केले असून राज्याने ६ लाखापेक्षा अधिक घरांवर सौरऊर्जा प्रकल्प बसविणाऱ्या निवडक राज्यांच्या गटात प्रवेश केल्याबद्दलही कौतुक केले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनात राज्यात प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेच्या अंमलबजावणीने वेग घेतला आहे. मे महिन्यात योजनेसाठी सादर अर्जांमध्ये देशात प्रथम क्रमांक, प्रकल्प बसविलेल्या एकूण घरांमध्ये दुसरा क्रमांक, प्रकल्पांच्या तपासणीमध्ये पहिला क्रमांक आणि पुरवठादारांच्या नोंदणीमध्ये दुसरा क्रमांक अशा रितीने या योजनेच्या बाबतीत महाराष्ट्र देशात सर्वोच्च कामगिरी करणाऱ्या पाच टॉपर राज्यांमध्ये समाविष्ट झाला आहे.

प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेची राज्यात महावितरणमार्फत अंमलबजावणी करण्यात येत आहे. या यशाबद्दल राज्याच्या अपर मुख्य सचिव (ऊर्जा) आभा शुक्ला आणि मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव तथा महावितरणचे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांनी कंपनीच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांचे अभिनंदन केले.

पंतप्रधान मा. नरेंद्र मोदी यांच्या मार्गदर्शनात सुरू करण्यात आलेल्या प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेत घरगुती वीज ग्राहकांना घराच्या छतावर सौर ऊर्जा निर्मिती प्रकल्प बसविण्यासाठी थेट अनुदान मिळते. एक किलोवॅटच्या प्रकल्पासाठी ३० हजार रुपये, दोन किलोवॅटसाठी ६० हजार रुपये व तीन किलोवॅटसाठी ७८ हजार रुपये अनुदान मिळते. या योजनेच्या अंमलबजावणीत वीज ग्राहकांकडून अर्जांची स्वीकृती, प्रत्यक्ष प्रकल्प बसविणे आणि त्याची तपासणी करून तो सुरू करणे हे तीन महत्त्वाचे टप्पे असतात. मे महिन्यात या योजनेसाठी देशभर विशेष अभियान चालविण्यात आले होते त्यामध्ये महाराष्ट्र राज्य टॉपर ठरले आहे.

योजनेसाठी मे महिन्यात प्राप्त झालेल्या अर्जांमध्ये ४ लाख ४९ हजार अर्जांसह महाराष्ट्र पहिल्या क्रमांकावर आहे. गुजरात (३ लाख), उत्तर प्रदेश (१ लाख), राजस्थान (४४ हजार) व केरळ (३५ हजार) या राज्यांचा महाराष्ट्रानंतर क्रमांक लागतो.

छतावर सौरऊर्जा प्रकल्प आस्थापित करण्यामध्ये महाराष्ट्र राज्य ५४ हजार प्रकल्पांसह दुसऱ्या क्रमांकावर आहे. याबाबतीत उत्तर प्रदेश (६४ हजार), गुजरात (३५ हजार), राजस्थान (२६ हजार) व केरळ (२० हजार) ही अन्य राज्ये टॉप पाच राज्यांमध्ये आहेत.

# अवैध दारू विक्री करणाऱ्यांवर अमरावती ग्रामीण पोलीसांची धडक कारवाई

प्रतिनिधी ४ जून



**अमरावती :** अवैध दारू विक्री करणा-यांवर अमरावती ग्रामीण पोलीसांची धडक कारवाई केली.

पोलीस अधिक्षक यांनी अमरावती ग्रामीण जिल्हयामध्ये होत असलेल्या अवैध हातभट्टी गावठी दारू तयार करणारे व विक्री करणा-यांवर कारवाई करण्याचे निर्देश दिले होते. त्या अनुषंगाने केलेली कारवाई केली यामध्ये पो.स्टे. शिरजगाव : दि. ०२/०५/२६ रोजी पो.स्टे. शिरजगाव कसबा हद्दीत पाळा येथे मेधा नदी काठी छापा कारवाई केली असता आरोपी कसंजु काशीनाथ कासदेकर, वय ३१ वर्ष, रा. बेतुल, मध्यप्रदेश, अब्दुल अन्सार शेख तुराप, वय ४८ वर्ष, रा. खोमई, ता. भैंसदेही, मध्यप्रदेश यांचे ताब्यातून २०० लीटर गा.हा.भ. दारू किं.अं. २०,०००/-, मोहमाच सडवा ३,००० लीटर किं.अं. १,२०,०००/- तसेच दारू बनविण्या साठी वापरण्यात येणारे गुळ, नवसागर इ. साहीत्य किं.अं. १३,१००/- असा एकूण १,५२,९००/- रू चा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

पो.स्टे. मंगरूळ च. आज रोजी मंगरूळ चवाळा पारधी बेडयावर छापा कारवाई केली असता, आरोपी सपना किसन भोसले, वय ३५ वर्ष, रा. मंगरूळ च रेशमा प्राणहंस भोसले, वय ४५ वर्ष, रा. मंगरूळ च., ललित उकंडा भोसले, वय ६४ वर्ष, रा. मंगरूळ च. या तिन्ही आरोपींचे ताब्यातून एकूण २५० लीटर गा.हा.भ. दारू किं. अं. २५,०००/- रू चा मुद्देमाल जप्त करण्यात आला व मोहमाच सडवा एकूण ४०० ली किं.अं. २२,५००/- रू असा मुद्देमाल जप्त करून नष्ट करण्यात आला.

पो.स्टे. ब्राम्हणवाडा सदर कारवाई दरम्यान आरोपी नामे जामवंत टीमाजी थोटे, वय ५८ वर्ष, रा. चिचकुंभ यांचे राहते घरी छापा कारवाई केली असता त्यांचे ताब्यातून ७५ लीटर गा.हा.भ. दारू आणि गुळ, नवसागर इ. साहीत्य किं.अं. १५,०००/-रू चा मुद्देमाल जप्त करण्यात आला व रनिंग हातभट्टी सुरू असताना रेड केली असता अंदाजे २०० लीटर मोहमाच सडवा किं.अं.२,००,०००/- रू चा मिळून आल्याने तो जप्त करून नष्ट करण्यात आला.

तसेच काल ०१/०५/२०२६ रोजी पो.स्टे. शिरजगाव हद्यीतील ग्राम पाळा नजीक (महाराष्ट्र-मध्यप्रदेश सिमेवरिल) मेघा नदीपात्रात छापा कारवाई करून गावठी हातभट्टी चालक आशिक कासदेकर, रा. सुपाळा (मध्यप्रदेश) यास ताब्यात घेवून १२० लीटर गा.हा.भ. दारू किं.अं. २४,०००/-२)२४०० लीटर मोहमाच सडवा किं.अं. २,४०,०००/- तसेच इतर साहीत्य गुळ, नवसागर इ. साहीत्य ५०,७५०/- असा एकूण ३,१४,७५० रू चा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

अशाप्रकारे एकूण ६४५ लीटर गा.हा.भ. दारू कि.अं ८४,०००/-, मोहमाच सडवा एकूण ६००० लीटर किं. अं ५,६३,८५०/- व इतर दारू बनविण्याचे साहीत्य किं. अं.६३,८००/- असा एकूण ७,११,६५०/- रू चा मुद्देमाल मिळून आला. सदरची कार्यवाही निकेतन कदम पोलीस अधिक्षक, अम. ग्रा., यांचे आदेशान्वये दत्ता तोटेवाड, (म.पो.से.) अपर पोलीस अधिक्षक, अम.ग्रा., यांचे मार्गदर्शनात किरण वानखडे, पो.नि. स्था.गु.शा., अमन शिरसाट, ठाणेदार, शिरजगाव., . प्रशांत जाधव, ठाणेदार,

# १९६२ हेल्पलाइन व व्हॉट्सप चॅटबॉटमुळे पशुवैद्यकीय सेवा घरपोच

♦ ८ लाखांहून अधिक जनावरांवर उपचार ; शेतकऱ्यांसाठी डिजिटल सुविधांचा विस्तार

प्रतिनिधी ४ जून

**अमरावती:** राज्यातील पशुपालक आणि शेतकऱ्यांना तात्काळ व सुलभ पशुवैद्यकीय सेवा उपलब्ध करून देण्यासाठी महाराष्ट्र शासनाचा पशुसंवर्धन विभाग, भारत फायनान्शियल इंक्लुजन लिमिटेड (BFIL) आणि इंडसइंड बँकेच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात येणारी '१९६२ टोल-फ्री हेल्पलाइन' प्रभावी ठरत आहे. गेल्या पाच वर्षांत या उपक्रमाद्वारे राज्यातील ८ लाखांहून अधिक जनावरांवर उपचार करण्यात आले असून ग्रामीण व दुर्गम भागातील पशुपालकांना मोठा दिलासा मिळाला आहे. पशुपालकांनी १९६२ हेल्पलाइन व व्हॉट्सॲप चॅटबॉट सेवेचा अधिकाधिक लाभ घ्यावा, असे आवाहन पशुसंवर्धन आयुक्त डॉ. किरण पाटील यांनी केले आहे.

मोबाईल व्हेटर्नरी युनिट्सच्या माध्यमातून पशुवैद्यकीय सेवा थेट शेतकऱ्यांच्या दारापर्यंत पोहोचविण्यात येत आहेत. या उपक्रमाच्या यशानंतर सेवा अधिक गतिमान आणि डिजिटल करण्याच्या उद्देशाने व्हॉट्सॲप-आधारित चॅटबॉट सेवा सुरू करण्यात आली आहे.

शेतकरी आणि पशुपालक +९१ ९०६३१४२२९९ या क्रमांकावर व्हॉट्सॲपवर ठण्ठ असा संदेश पाठवून किंवा क्यूआर कोड स्कॅन करून या सेवेचा लाभ घेऊ शकतात. या माध्यमातून पशुधनाचे आजार, उपचार, लसीकरण, पशुसंवर्धनविषयक माहिती तसेच विविध शासकीय योजनांची माहिती मिळते. तसेच चॅट, ऑडिओ कॉल आणि व्हिडिओ कॉलद्वारे पशुवैद्यकीय तज्ज्ञांशी थेट संवाद साधण्याची सुविधाही उपलब्ध आहे.

या चॅटबॉटमध्ये पशुवैद्यकीय टेलिकन्सल्टेशन, पशुवैद्यकीय रुग्णालयांची माहिती, सेवा निर्देशिका, शासकीय योजनांची माहिती आणि वारंवार विचारल्या जाणाऱ्या प्रश्नांची उत्तरे यांचा समावेश करण्यात आला आहे.

ऑक्टोबर २०२५ ते मे २०२६ या कालावधीत ६१५ शेतकऱ्यांनी चॅटबॉटचा वापर केला असून २०१ व्हिडिओ कन्सल्टेशन यशस्वीरित्या पार पडली आहेत. त्यामुळे पशुधनाच्या आरोग्याशी संबंधित समस्यांवर त्वरित मार्गदर्शन मिळत असून शेतकऱ्यांचा वेळ आणि खर्च दोन्हींची बचत होत आहे. राज्यातील पशुवैद्यकीय सेवा अधिक सक्षम, सुलभ आणि तंत्रज्ञानाधारित करण्यासाठी हा उपक्रम महत्त्वपूर्ण ठरत असल्याचे पशुसंवर्धन विभागाने सांगितले, असेही पशुसंवर्धन विभागाव्दारे सांगण्यात आले आहे.

# मृतदेहाची ओळख पटवण्यासाठी पोलिसांनी डीएनए चाचणी केली

♦मृतदेह काजल इंगळे यांचा असल्याचे निष्पन्न
♦या हत्येमागे प्रेमप्रकरण असल्याचा संशय

प्रतिनिधी ४ जून



**अमरावती:** गडगेनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील तापोवन टेकडी जंगलातील नाल्यात मंगळवारी सापडलेल्या अर्धवट जळालेल्या महिलेच्या मृतदेहाची अखेर ओळख पटली आहे.

मृत महिलेची ओळख काजल जितेंद्र इंगळे (वय २१, विश्रोळी, चांदूर बाजार तालुका) अशी पटली आहे.

तिच्या कुटुंबीयांचा आरोप आहे की, तिच्या माजी प्रियकराने त्याच्या साथीदारांसह लोखंडी सळीने तिच्या तोंडात आणि पोटात वार करून तिची निर्घृण हत्या केली आणि नंतर तिचा मृतदेह जाळून टाकला. आई-वडिलांनी आपल्या मुलीला तिच्या कपड्यांवरून ओळखले. पोलिसांनी दोघांचेही



डीएनए नमुने घेतले आहेत. या प्रकरणी पोलिसांनी तिचा माजी प्रियकर, साहिर्ता टानो याला चौकशीसाठी ताब्यात घेतले आहे.

# वाघिणीला नव्हे तर तिच्या शावकाला परतवाडा येथे हलविले

प्रतिनिधी ४ जून

**अमरावती:** सिंदेवाही परिक्षेत्र (ब्रह्मपुरी प्रादेशिक वनविभाग) येथील 'ऊ२' नामांकित वाघिणीच्या शावकासंदर्भात काही वृत्तपत्रांमध्ये प्रसिद्ध झालेली माहिती वस्तुस्थितीला धरून नसून दिशाभूल करणारी आहे. या चुकीच्या बातम्यांमुळे स्थानिक नागरिकांमध्ये अनावश्यक भीतीचे आणि वन विभागाच्या कार्यपद्धतीबाबत गैरसमजाचे वातावरण निर्माण होत असल्याचे वन विभागाद्वारे स्पष्ट करण्यात आले आहे.

याबाबतची खरी वस्तुस्थिती अशी की, सिंदेवाही परिक्षेत्रातील 'ऊ२' वाघीण मानव-वन्यजीव संघर्ष निर्माण करत असल्यामुळे, वन विभागाने खबरदारीचा उपाय म्हणून तिला तिच्या शावकांसह सुरक्षितपणे पकडले आहे. मात्र, वृत्तपत्रांमध्ये प्रसिद्ध झाल्याप्रमाणे 'ऊ२' वाघिणीला परतवाडा येथे हलवलेले नसून, तिच्या शावकांपैकी एका शावकाला (ऊ२ एलं १) पुढील आवश्यक व्यवस्थापन, सुरक्षितता आणि वैद्यकीय देखरेखीच्या दृष्टीने परतवाडा ट्रान्झिट ट्रीटमेंट सेंटर येथे स्थलांतरित करण्यात आले आहे. या शावकाला मेळघाट व्याघ्र प्रकल्पात सोडण्यात येणार असल्याच्या अफवा देखील पसरत आहेत, परंतु सद्यस्थितीत या 'ऊ२ एलं १' शावकास मेळघाट व्याघ्र प्रकल्पामध्ये सोडण्याचा किंवा मुक्त अधिवासात पुनर्स्थापित करण्याचा कोणताही निर्णय अथवा योजना वन विभागाच्या विचाराधीन नाही. शावकाला केवळ सुरक्षित वातावरणात वैद्यकीय देखरेख आणि आवश्यक निगा उपलब्ध करून देणे हाच या स्थलांतराचा प्रमुख उद्देश आहे. प्रसारमाध्यमांनी नागरिकांमध्ये संभ्रम निर्माण होणार नाही यासाठी वस्तुस्थितीवर आधारित आणि वन विभागाकडून पडताळणी केलेली अचूक माहिती प्रसारित करावी, असे आवाहन वन विभागातर्फे करण्यात आले आहे.

# युवकाची गळफास घेऊन आत्महत्या

**तिवसा :** तळेगाव येथील २० वर्षीय मेंढपाळ युवकाने ३ जून रोजी सकाळी राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केल्याची दुर्दैवी घटना घडली. या घटनेमुळे गावात हळहळ व्यक्त होत असून परिसरात शोककळा पसरली आहे. कृष्णा नाथाजी कोरटकर (२०) रा. तळेगाव ठाकूर असे मृत युवकाचे नाव आहे. कृष्णा हा बुधवारी सकाळी नेहमीप्रमाणे मेंढ्या चारण्यासाठी गेला होता. त्यानंतर सकाळी सुमारे ९ वाजताच्या दरम्यान तो घरातील नळाचे पाणी भरण्यासाठी घरी आला. यावेळी घरातील मानसिकदृष्ट्या अस्वस्थ असलेल्या भावाला एका खोलीत ठेवून त्याने घरातील इतर दरवाजे आतून बंद केले. दरम्यान, मोठा भाऊ रमेश कोरटकर घरी आल्यानंतर घराबाहेर कृष्णाच्या चपला दिसल्याः मात्र दरवाजा आतून बंद असल्याने त्यांना संशय आला. त्यांनी शेजाऱ्यांना बोलावून दरवाजा तोडला असता कृष्णा हा घरातील खोलीत दोरीच्या साहाय्याने गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळून आला. घटनेची माहिती तत्काळ तिवसा पोलिसांना देण्यात आली. ठाणेदार गोपाल उपाध्याय यांनी हेकॉ रवींद्र लांजेवार, मेहरे यांना तातडीने घटनास्थळी धाव घेऊन पंचनामा केला व मृतदेह शवविच्छेदनासाठी तिवसा ग्रामीण रुग्णालयात पाठविला. कृष्णा कोरटकर याने आत्महत्येसारखे टोकाचे पाऊल का उचलले, याचे नेमके कारण अद्याप समोर आलेले नाही.

# महाविद्यालये व प्राध्यापकांच्या विविध प्रश्नांवर सहसंचालक उच्च शिक्षण यांच्याशी चर्चा

♦शैक्षिक महासंघाच्या अनेक वर्षांच्या मागणीची पूर्तता; कालमर्यादित प्रकरण निपटाऱ्यासाठी नागरिकांची सनद जाहीर ♦सहसंचालकांचे शैक्षिक महासंघाकडून अभिनंदन

प्रतिनिधी ४ जून

**अमरावती:** अखिल भारतीय राष्ट्रीय शैक्षिक महासंघाच्या विभागीय अध्यक्ष प्राचार्य डॉ. मीनल भोंडे यांच्या मार्गदर्शनात तसेच विभागीय महामंत्री प्रा. डॉ. मंगेश अडगोकर यांच्या नेतृत्वात महासंघाच्या शिष्टमंडळाने मा. डॉ. अभय खांबोरकर, सहसंचालक, उच्च शिक्षण, अमरावती विभाग यांची भेट घेऊन महाविद्यालये व प्राध्यापकांच्या विविध प्रलंबित प्रश्नांबाबत सविस्तर चर्चा केली. बैठकीत अनेक महत्त्वाच्या विषयांवर सकारात्मक व विधायक चर्चा झाली असून संबंधित प्रश्नांच्या निराकरणासाठी आवश्यक कार्यवाही करण्याचे. आश्वासन सहसंचालकांनी दिले.

सत्र २०२६-२७ लवकरच सुरू होत असल्याच्या पार्श्वभूमीवर तासिका तत्त्वावरील अध्यापकांच्या नियुक्ती प्रक्रियेला तातडीने सुरुवात करण्याची महासंघाने मागणी केली. नियमित पदभरती प्रक्रिया सुरू असली तरी ती पूर्ण होईपर्यंत अध्यापन कार्य सुरळीत सुरू ठेवण्यासाठी तासिका तत्त्वावरील अध्यापकांची आवश्यकता असल्याचे महासंघाने निदर्शनास आणून दिले. विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टाळण्यासाठी आवश्यक प्रक्रिया त्वरित सुरू करण्यात येईल, असे आश्वासन यावेळी मा. सहसंचालकांनी दिली.



महासंघाने यापूर्वी दिलेल्या स्मरणपत्राच्या माध्यमातून प्राध्यापकांच्या प्रलंबित स्थाननिश्चिती, पदोन्नती, वेतननिश्चिती व पुनर्निर्धारण प्रकरणांचा प्रश्न उपस्थित केला. विशेषतः एम.फिल. पात्रताधारक सेवानिवृत्त व दिवंगत प्राध्यापकांच्या स्थाननिश्चिती, पदोन्नती (सीएएस) व अनुषंगिक लाभांची अनेक प्रकरणे अद्याप प्रलंबित असल्याची बाब निदर्शनास आणून देण्यात आली. कार्यरत प्राध्यापकांना लाभ मंजूर झाल्यानंतरही सेवानिवृत्त व दिवंगत प्राध्यापकांच्या प्रकरणांवर निर्णय न होणे अन्यायकारक असल्याचे महासंघाने नमूद केले. या संदर्भात शासन स्तरावरून तातडीने मार्गदर्शन घेऊन आवश्यक कार्यवाही करण्यात येईल, असे आश्वासन सहसंचालकांनी दिले.

अनुदानित महाविद्यालयांतील रिक्त पदे भरण्याच्या प्रक्रियेबाबतही बैठकीत सविस्तर चर्चा झाली. अनेक महाविद्यालयांच्या पदनिर्धारणामध्ये दुरुस्ती करण्याची आवश्यकता असल्याची बाब महासंघाने निदर्शनास आणून दिली. पदनिर्धारणातील त्रुटी वेळेत दुरुस्त न झाल्यास काही विषयांना अन्याय होण्याची तसेच महाविद्यालयांच्या शैक्षणिक गरजा अपूर्ण राहण्याची शक्यता असल्याचे महासंघाने स्पष्ट केले. संपूर्ण भरती प्रक्रिया संपूर्ण भरती प्रक्रिया निश्चित कालबद्ध वेळापत्रकानुसार राबविण्याचा आग्रह यावेळी धरण्यात आला. यावर शासनाने विकसित केलेल्या विशेष पोर्टलच्या माध्यमातून संपूर्ण प्रक्रिया राबविण्यात येणार असून ती अत्यंत पारदर्शक व तंत्रज्ञानाधिष्ठित असेल, अशी माहिती सहसंचालकांनी दिली.

बैठकीत सहसंचालक कार्यालयाच्या संकेतस्थळाच्या अद्ययावतीकरणाचा विषयही उपस्थित करण्यात आला. विभागीय संकेतस्थळावर जीपीएफ, डीसीपीएफ/एनपीएस संदर्भातील अद्ययावत माहिती, शासन निर्णय, परिपत्रके, कार्यालयीन आदेश व सूचना नियमितपणे उपलब्ध करून देण्याची मागणी महासंघाने केली. यावर सहसंचालक कार्यालयाने नवीन संकेतस्थळ विकसित केले असून त्यावर आवश्यक सुविधा टप्प्याटप्प्याने उपलब्ध करून दिल्या जातील, असे सांगण्यात आले.

यावेळी महासंघाने सहसंचालक कार्यालयाने जाहीर केलेल्या नागरिकांच्या सनदेचे विशेष स्वागत केले. विविध प्रकारच्या प्रकरणांच्या निपटाऱ्यासाठी निश्चित कालमर्यादा जाहीर करून पारदर्शक, उत्तरदायी व नागरिकाभिमुख प्रशासनाच्या दिशेने महत्त्वपूर्ण पाऊल उचलल्याबद्दल महासंघाने मा. सहसंचालकांचे अभिनंदन केले. विशेष म्हणजे, नागरिकांची सनद जाहीर करण्याबाबत महासंघ सातत्याने पाठपुरावा केल्याचे फलित प्राप्त झाल्याचा आनंद व्यक्त करण्यात आला.

याबाबत बोलताना सहसंचालकांनी सांगितले की, अल्पावधीतच कार्यालयाचे संपूर्ण कामकाज ई-ऑफिस प्रणालीद्वारे करण्यात येणार असून महाविद्यालयांना त्यांच्या स्वतंत्र लॉग-इनद्वारे विविध प्रस्ताव सादर करता येतील. तसेच प्रत्येक प्रकरणाची अद्ययावत स्थिती ऑनलाइन पाहण्याची सुविधा उपलब्ध होणार आहे. यामुळे कामकाजात अधिक पारदर्शकता, गतिमानता आणि उत्तरदायित्व निर्माण होईल. महासंघाच्या शिष्टमंडळाने या उपक्रमाचे स्वागत करून सहसंचालक कार्यालयाचे अभिनंदन व आभार व्यक्त केले.

या बैठकीस कार्यालयाचे प्रशासकीय अधिकारी मा. डॉ. प्रभू दवणे उपस्थित होते. महासंघाच्या वतीने विभागीय कोषाध्यक्ष प्रा. डॉ. दिनेश खेडकर, विभागीय महिला प्रमुख प्रा. डॉ. रेखा मग्गीरवार, अमरावती शहराध्यक्ष प्रा. डॉ. ओमप्रकाश मुंदे, अधिष्ठाता प्राचार्य डॉ. एच. आर. देशमुख, प्राचार्य डॉ. दिनेश निचत, प्रा. डॉ. अनुप शर्मा, प्राचार्य डॉ. उदय मांजरे, तसेच विविध महाविद्यालयांतील तासिका तत्त्वावरील प्राध्यापक उपस्थित होते.

सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम
गुरूवार दि ४ जून २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

राजकीय ॲक्टर,
स्त्रीभ्रूणहत्येचा फॅक्टर,
अविवेकी डॉक्टर ,
बोगस कॅरेक्टर...




## आरोपी ज्ञात, दाखविला अज्ञात...



# कारवाई न करण्याचा करार, अज्ञाताविरूध्द तक्रार, आरोपी फरार !

●सिटी न्युज ब्युरो @ वाशीम●

* अविवेकी डॉक्टरच्या डॉक्टर पत्नीच्या नावाची परिसरात चर्चा
* मालेगाव येथील बेकायदेशिर स्त्रीभृण हत्या प्रकरण
* पोलिस व आरोग्य विभागाच्या कार्यप्रणालीवर प्रश्नचिन्ह

मालेगाव येथील आरोग्य विभागाच्या वैद्यकीय अधीक्षकांनी राजाश्रय असलेल्या सत्ताधारी पक्षाच्या 'निष्ठा' वान कार्यकर्ता असलेल्या अविवेकी डॉक्टरच्या बेकायदेशीररित्या गर्भ लिंग निदान चाचणीसह स्त्री भ्रूण हत्या करणाऱ्या कथित सोनोग्राफी सेंटर वर 'सिंघम' स्टाईल धाडसी कारवाई करून अविवेकी दाम्पत्याचे काळे कारनामे उघडकीस आणून स्वतःची पाठ थोपटून घेतली आहे. परंतु ही धडाकेबाज कारवाई करतांना अविवेकी डॉक्टरच्या डॉक्टर असलेल्या आणि अविवेकी डॉक्टरच्या प्रत्येक पापात सहभागी असलेल्या 'पुरोगामी' पत्नीचे नाव 'ज्ञात' असूनही तक्रार देतांना 'अज्ञात' महिला डॉक्टर असा उल्लेख केल्याने आरोग्य व पोलीस प्रशासनाच्या कार्यप्रणालीबाबत परिसरात उलटसुलट चर्चेला उधाण आले आहे.




दोन आठवड्यापुर्वी मालेगाव नगरीत जगजाहीर झालेल्या अविवेकी डॉक्टरच्या माने हॉस्पीटल मध्ये खुलेआम सुरू असलेल्या बेकायदेशीर गर्भ लिंग निदान चाचणीसह स्त्री भ्रूण हत्या करणाऱ्या सोनोग्राफी सेंटरवर बोगस गर्भवती असलेल्या महिलेस पाठवून आरोग्य विभागाने टाकलेल्या कारवाईत माने दाम्पत्यासह काही दलालांची नावे समोर आलीत. आरोग्य विभागाचे वैद्यकीय अधीक्षक व त्यांची टीम ही धडाकेबाज कारवाई करण्यासाठी माने हॉस्पीटल मध्ये गेले असता त्यांनी समोरच्या दरवाजाने प्रवेश केला. माने दाम्पत्यावर कारवाईची 'विज' कोसळणार असल्याची चाहूल लागताच 'या' बेकायदेशीर कृत्यात सहभागी असलेले सर्व 'ज्ञात' आरोपी मागील दरवाजाने फरार झाल्याची चर्चा आहे. या काळ्या कृत्यात सदैव सहभागी असलेल्या अविवेकी डॉक्टरच्या 'पुरोगामी' विचाराच्या डॉक्टर असलेल्या पत्नीचे नाव सर्वांना ज्ञात असताना या प्रकरणात अज्ञात महिला डॉक्टर असा जाणूनबुजून उल्लेख केल्याची परिसरात चर्चा आहे. आता या प्रकरणाचा सखोल तपास करण्यासाठी मालेगाव पोलीस असमर्थ असतील तर पोलीस अधीक्षकांनी समर्थ असलेल्या एलसीबी कडे तपास सुपूर्द करून या महापापात सहभागी असलेल्या सर्व आरोपींना गजाआड करण्यासाठी पुढाकार घेण्याची मागणी विविध स्तरातून केल्या जात आहे.

### जिल्ह्यातील विविध महिला संघटनांचे मौनव्रत

दोन आठवड्यापूर्वी मालेगाव नगरीत उघडकीस आलेला स्त्री भ्रूण हत्येचे प्रकरण गाजत आहे. एरव्ही कोणत्याही शुल्लक कारणावरुन 'आवाज ' उठविणाऱ्या विविध पक्षाच्या आणि स्वयंसेवी संस्थेच्या महिला सक्षमीकरणाच्या गाजावाजा करणाऱ्या महिला संघटनांनी माने दाम्पत्याच्या बेकायदेशीर स्त्री भ्रूण हत्येच्या प्रकरणात 'मौनव्रत' धारण केल्याचीही पंचक्रोशीत चर्चा आहे.

## थोडक्यात

### संभाजी ब्रिगेडच्या तालुकाध्यक्षपदी ॲड.अजय गवारगुरु यांची फेरनिवड



●सिटी न्युज ब्युरो @ मंगरूळपीर●

संभाजी ब्रिगेड, मंगरूळपीरच्या तालुकाध्यक्षपदी ॲड.अजय गवारगुरु यांची पुन्हा एकदा फेरनिवड करण्यात आली आहे. त्यांच्या सामाजिक, संघटनात्मक व पक्षासाठी केलेल्या सातत्यपूर्ण कार्याची दखल घेत तसेच समाजहिताच्या विविध उपक्रमांमध्ये दिलेल्या योगदानाच्या पार्श्वभूमीवर ही निवड करण्यात आली आहे. वाशिम येथील स्थानिक विश्रामगृह येथे दि. ३१ मे रोजी पार पडलेल्या कार्यकर्ता प्रवेश सोहळ्यात संभाजी ब्रिगेडचे प्रदेशाध्यक्ष ॲड.मनोजदादा आखरे व जिल्हाध्यक्ष गजाननदादा भोयर यांच्या हस्ते तसेच इतर पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत नियुक्तीपत्र देऊन ही निवड करण्यात आली.

या निवडीमुळे कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून आगामी काळात पक्ष, संघटना अधिक बळकट करण्यासाठी आणि सामाजिक प्रश्नांवर प्रभावीपणे काम करण्यासाठी ॲड. गवारगुरु प्रयत्नशील राहतील, असा विश्वास पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला.

### 'दामिनी' ॲप देणार वीज पडण्याची पूर्वसूचना

**वाशीम :** मान्सून कालावधीत, विशेषतः जून व जुलै महिन्यांदरम्यान वीज पडण्याच्या घटना वाढत असून, दरवर्षी यामुळे जीवित व वित्तीय हानी होत असल्याचे निदर्शनास येते. या पार्श्वभूमीवर नागरिकांच्या सुरक्षेसाठी पृथ्वी विज्ञान मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांच्या वतीने 'दामिनी' (Damini Lightning Alert) हे मोबाईल ॲप विकसित करण्यात आले आहे.

या ॲपच्या माध्यमातून वीज पडण्याच्या संभाव्य घटनांची पूर्वसूचना सुमारे १५ मिनिटे आधी नागरिकांना प्राप्त होते. हे ॲप जीपीएस प्रणालीवर आधारित असून, वापरकर्त्यांच्या सद्यस्थितीनुसार आसपासच्या परिसरातील विजेची हालचाल आणि संभाव्य धोका दर्शविते.

## ग्रामसेवक पैशासाठी लाचार, कामे न करता भ्रष्टाचार !

●प्रभाकर नाईकवाडे @ रिसोड●

*या, ग्रामसेवकांचा प्रताप अंचळसह केनवडात तर नाही ना
* म्हणे सीईओ हाताशी; मग भीती आम्हाला कशाची..?







अंचळ ग्रामपंचायतीतील विविध विकासकामे, व्हाउचर आणि ई-ग्रामस्वराज पोर्टलवरील खर्चाच्या नोंदींमुळे निर्माण झालेली चर्चा आता केवळ एका गावापुरती मर्यादित राहिलेली नाही. अंचळप्रमाणेच संबंधित ग्रामसेवकांकडे असलेल्या केनवडसह इतर ग्रामपंचायतींमध्येही असाच काही प्रकार घडला आहे का, याबाबत नागरिकांमध्ये चर्चा सुरू झाली असून, सिटी न्यूज सुपरफास्टने यासंदर्भात पुरावे गोळा करण्यास सुरुवात केली आहे.

अंचळ प्रकरणानंतर केनवड परिसरातील विविध ग्रामपंचायतींमधील १४ वा वित्त आयोग, १५ वा वित्त आयोग तसेच इतर विकास योजनांअंतर्गत झालेल्या कामांबाबत नागरिक प्रश्न उपस्थित करू लागले आहेत. ई-ग्रामस्वराज पोर्टलवरील व्हाउचर, मोजमाप पुस्तिका (एमबी), अंदाजपत्रके, खर्चाच्या नोंदी आणि प्रत्यक्ष कामांची स्थिती याबाबत माहिती व कागदपत्रे संकलित करण्याचे काम सिटी न्यूज सुपरफास्टकडून सुरू करण्यात आले आहे. अनेक ठिकाणी कागदोपत्री दाखविण्यात आलेली कामे प्रत्यक्षात झाली आहेत का, ती मंजूर अंदाजपत्रकानुसार व दर्जेदार पद्धतीने पूर्ण करण्यात आली आहेत का, तसेच खर्च केलेल्या निधीचा लाभ नागरिकांपर्यंत पोहोचला आहे का, याबाबत ग्रामस्थांशी संवाद साधून माहिती व पुरावे गोळा करण्यात येत आहेत. दरम्यान, परिसरात 'सीईओच आमच्या हाताशी; मग भीती आम्हाला कशाची?' अशी चर्चा रंगत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. त्यामुळे या चर्चेमुळे ग्रामस्थांमध्ये संशयाचे वातावरण निर्माण झाले असून, संबंधित सर्व विकासकामांची निष्पक्ष चौकशी करून दोषी आढळल्यास तत्काळ कारवाई करावी, अशी मागणी जोर धरत आहे. सिटी न्यूज सुपरफास्टच्या हाती काही प्राथमिक कागदपत्रे तसेच ई-ग्रामस्वराज पोर्टलवरील विविध नोंदी लागल्या असून, त्यांची छाननी सुरू आहे. या छाननीतून समोर येणाऱ्या बाबी टप्प्याटप्प्याने जनतेसमोर मांडण्यात येणार असल्याचे समजते. जनतेच्या पैशातून होणाऱ्या प्रत्येक विकासकामाचा हिशोब जनतेसमोर आला पाहिजे, या भूमिकेतून सिटी न्यूज सुपरफास्टची माहिती संकलन मोहीम सुरू असून, 'अंचळ ही फक्त सुरुवात आहे; केनवड परिसरातील गावागावातील प्रश्नही आता प्रकाशझोतात आणले जातील,' अशी भावना नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

**परिसरातील गावागावातून सिटी न्यूज सुपरफास्टकडे गावकऱ्यांची स्वतःहून माहिती देण्याचा ओघ सुरू..!**

केनवड परिसरातील अनेक गावांमधून नागरिक भ्रमणध्वनीद्वारे विविध विकासकामे, व्हाउचर, एमबी, निधी खर्च तसेच कथित अनियमिततेसंदर्भातील माहिती आता स्वतःहून सिटी न्यूज सुपरफास्टपर्यंत पोहोचवत आहेत. सिटी न्यूज सुपरफास्टने सुरू केलेल्या या मालिकेमुळे अनेक गावकरी पुढे येत असून, उपलब्ध कागदपत्रे आणि पुरावे देण्यासाठीही तयारी दर्शवत आहेत. प्राप्त होणाऱ्या कागदपत्रांची पडताळणी करून वस्तुस्थिती जनतेसमोर आणण्याचा प्रयत्न सुरू आहे. अंचळ ही फक्त सुरुवात असून, केनवड परिसरातील गावागावांतील विकासकामांची कागदपत्रे, व्हाउचर, एमबी व खर्चाच्या नोंदी गोळा करण्याचे काम सिटी न्यूज सुपरफास्टकडून वेगाने सुरू आहे. जनतेच्या पैशाचा हिशोब जनतेसमोर आणण्याच्या उद्देशाने ही मोहीम राबविण्यात येत असून, पुढील भागांत आणखी कोणत्या गावाचा कारभार समोर येणार, याकडे संपूर्ण परिसराचे लक्ष लागले आहे. त्यामुळे 'आपल्या गावातही असा प्रकार झाला नाही ना?' असा प्रश्न आता नागरिक स्वतः विचारू लागले आहेत.

विशेष म्हणजे, आता गावकरीच स्वतःहून भ्रमणध्वनीद्वारे माहिती, कागदपत्रे आणि पुरावे सिटी न्यूज सुपरफास्टकडे पाठवत असून, परिसरातील अनेक धक्कादायक बाबी पुढील भागांत समोर येण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

## जेईई ॲडव्हान्स्ड परीक्षेत वाशीमच्या स्वर्गा कुटेचे सुयश

●सिटी न्युज ब्युरो @ वाशीम●



नुकताच जाहीर झालेल्या आयआयटी (IIT) प्रवेशासाठीच्या 'जेईई ॲडव्हान्स्ड' (JEE Advanced) परीक्षेच्या निकालात वाशिमची कन्या स्वर्गा महेश कुटे हिने घवघवीत यश संपादन केले आहे. अत्यंत कठीण मानल्या जाणाऱ्या या परीक्षेत तिने मिळवलेल्या यशामुळे तिच्यावर आणि तिच्या कुटुंबावर संपूर्ण जिल्ह्यातून कौतुकाचा वर्षाव होत आहे.

स्वर्गा हिने सुरुवातीपासूनच अभ्यासात सातत्य ठेवले होते. तिने मिळवलेले हे यश केवळ तिच्या कुटुंबासाठीच नव्हे, तर संपूर्ण वाशिम जिल्ह्यासाठी अभिमानास्पद ठरले आहे. दर्जेदार शिक्षण, कठोर परिश्रम आणि योग्य मार्गदर्शनाच्या जोरावर ग्रामीण भागातील किंवा छोट्या शहरातील विद्यार्थीही देशातील सर्वोच्च पातळीवरील परीक्षेत उत्तम कामगिरी करू शकतात, हे तिने पुन्हा एकदा सिद्ध केले आहे. तिच्या या यशाबद्दल बोलताना तिच्या पालकांनी आणि शिक्षकांनी कमालीचा आनंद व्यक्त केला. स्वर्गाने आपल्या यशाचे श्रेय तिचे आई-वडील, शिक्षक आणि तिच्या कठोर परिश्रमांना दिले आहे. आगामी काळात आयआयटीमधून उच्च शिक्षण घेऊन देशाच्या सेवेत योगदान देण्याचा तिचा मानस आहे. तिच्या या यशाबद्दल विविध क्षेत्रांतील मान्यवरांकडून तिचे अभिनंदन केले जात असून, तिच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या जात आहेत.

## जागतिक सायकल दिनानिमित्त सायकल रॅली



●सिटी न्युज ब्युरो @ वाशीम●

जिल्हा विधी सेवा प्राधिकरण व जिल्हा विधिज्ञ मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक सायकल दिनानिमित्त ३ जून २०२६ रोजी सायकल रॅलीचे आयोजन करण्यात आले.

या रॅलीचा शुभारंभ प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा जिल्हा विधी सेवा प्राधिकरण अध्यक्ष अनिल सुब्रमण्यम यांच्या हस्ते हिरवी झेंडी दाखवून करण्यात आला.

जिल्हा व सत्र न्यायालय येथून सुरू झालेली ही रॅली बसस्थानक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक, पाटणी चौक, अकोला नाका, आर.टी.ओ. कार्यालय मार्गे पुन्हा जिल्हा न्यायालय परिसरात दाखल झाली. सायकलचा वापर वाढवून पर्यावरण संवर्धन, आरोग्यदायी जीवनशैली आणि इंधन बचतीचा संदेश देण्याच्या उद्देशाने या रॅलीचे आयोजन करण्यात आले.

यावेळी जिल्हा विधी सेवा प्राधिकरणचे सचिव व्ही. जी. चौखंडे, मुद्रांक जिल्हाधिकारी राजेश वजिरे, जिल्हा विधिज्ञ संघाचे अध्यक्ष ॲड. अनुप बाकलीवाल, मुख्यन्यायरक्षक ॲड. परमेश्वर शेळके, जिल्हा विधिज्ञ मंडळाचे उपाध्यक्ष ॲड. वैभव तिफणे, लेखाधिकारी युसूफ शेख, सहायक सरकारी अभियोक्ता ॲड. विजय आरू, निशांत पतसंस्थेचे प्रादेशिक व्यवस्थापक सुरेश शिंदे, ॲड. विजय कांबळे, सहकार विभाग लेखापाल घमराव घुगे, चार्टर्ड अकाउंटंट मारोती भोयर, प्रा. कहाते, राजेश एकाडे, श्री. शर्मा, ॲड. केसवाणी तसेच न्यायालयीन कर्मचारी उपस्थित होते.

## रिसोड - हिंगोली रस्त्यावर अवैध हातभट्टीचा निघतो धूर !

●सिटी न्युज ब्युरो @ रिसोड●

### राज्य उत्पादन शुल्क विभागाचे दुर्लक्ष



रिसोड पोलीस स्टेशन हद्दीतील हिंगोली रस्त्यावर अवैध हातभट्टी दारू निर्मितीचा धूर खुलेआम निघत असल्याचा आरोप स्थानिक नागरिकांकडून केला जात आहे. पुण्यात विषारी दारू प्रकरणात अनेक निष्पाप नागरिकांचा मृत्यू झाल्याची घटना अद्याप ताजी असतानाही, रिसोड शहरात अवैध गावठी दारू विक्री आणि निर्मिती सर्रास सुरू असल्याची चर्चा परिसरात रंगत आहे.

विशेषतः हिंगोली रोड परिसरात काही ठिकाणी उघडपणे गावठी दारूच्या भट्ट्या सुरू असल्याचे नागरिकांचे म्हणणे असून, याकडे स्थानिक पोलीस प्रशासन व राज्य उत्पादन शुल्क विभागाकडून दुर्लक्ष होत असल्याचा आरोप केला जात आहे. स्थानिकांच्या माहितीनुसार, काही ठिकाणी रस्त्यालगतच गावठी दारू तयार केली जात असून, त्याचा तीव्र वास ये-जा करणाऱ्या प्रवाशांनाही जाणवतो. एवढे असूनही संबंधित यंत्रणांकडून ठोस कारवाई होत नसल्याने नागरिकांमध्ये नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे. पुण्यासारखी दुर्दैवी घटना घडल्यानंतरही रिसोड शहरात अवैध दारू व्यवसाय सुरूच असल्याने, राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या भरारी पथकाच्या कार्यक्षमतेबाबत प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे. अवैध दारूविरोधात कारवाई करणे हे संबंधित विभागाचे प्रमुख कर्तव्य असताना, प्रत्यक्षात मात्र कारवाई होत नसल्याची चर्चा शहरात सुरू आहे. हिंगोली रोड परिसरात दारू पिणाऱ्यांची वर्दळ वाढल्यामुळे रस्त्याने येणाऱ्या-जाणाऱ्या नागरिकांना, विशेषतः महिला व विद्यार्थ्यांना त्रास सहन करावा लागत असल्याच्या तक्रारी अनेकदा रिसोड पोलीस ठाण्यात करण्यात आल्याचेही स्थानिकांचे म्हणणे आहे. मात्र अद्याप ठोस उपाययोजना झालेली नसल्याची खंत नागरिक व्यक्त करीत आहेत.

### पुण्यासारखी घटना घडण्यापूर्वी कारवाईची मागणी

रिसोड शहरात विषारी दारूमुळे कोणतीही अनुचित घटना घडण्यापूर्वी स्थानिक पोलीस प्रशासन आणि राज्य उत्पादन शुल्क विभागाने संयुक्त मोहीम राबवून शहरातील, विशेषतः हिंगोली रोड परिसरातील अवैध गावठी दारू व्यवसाय पूर्णतः बंद करावा, अशी मागणी प्रवासी, स्थानिक नागरिक तसेच सायंकाळी क्रीडा संकुल परिसरात फिरण्यासाठी येणाऱ्या नागरिकांकडून करण्यात येत आहे. दारूच्या भट्ट्यांमधून निघणारा धूर, तसेच मद्यधुंद अवस्थेतील काही व्यक्तींची वर्दळ यामुळे एखादी गंभीर दुर्घटना घडल्यास त्याची जबाबदारी कोण घेणार, असा सवाल सरावासाठी येणाऱ्या युवक-युवतींच्या पालकांकडून उपस्थित केला जात आहे. 'पुण्यातील दुर्घटनेतून प्रशासनाने धडा घ्यावा आणि रिसोडातील अवैध हातभट्टी व्यवसायावर तातडीने कारवाई करावी,' अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

## वादळी वाऱ्याचा कहर; सोलर पॅनलचे नुकसान !

●सिटी न्युज ब्युरो @ रिसोड●



मान्सूनपूर्व अवकाळी वादळी वाऱ्याने दि. ०१ जून २०२६ रोजी सायंकाळी सुमारे सात वाजण्याच्या सुमारास केनवड परिसराला जोरदार वादळी वाऱ्याने तडाखा दिला. या वादळामुळे केनवड सह अंचळ, कुकसा, पिंपरी सरहद्द, नावली तसेच परिसरातील अनेक गावांतील शेतकऱ्यांच्या शेतातील सोलर पॅनल व त्यावरील संरचनांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.

जोरदार वाऱ्यामुळे अनेक ठिकाणी सोलर पॅनल उखडले, लोखंडी फ्रेम वाकल्या तर काही ठिकाणी गोठ्यांवरील टिनपत्रे उडून गेली. तसेच झाडे उन्मळून पडल्याने शेतकऱ्यांचे आणखी नुकसान झाले आहे. अचानक आलेल्या वादळामुळे शेतकऱ्यांना मोठा आर्थिक फटका बसला आहे. परिसरातील बहुतांश गावांमध्ये नुकसान झाल्याचे चित्र असून अनेक शेतकरी आपले नुकसान पाहून हतबल झाले आहेत. शेतीसाठी वीजपुरवठ्याचा पर्याय म्हणून उभारण्यात आलेल्या सोलर प्रकल्पांचे नुकसान झाल्याने शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे.

सिटी न्यूज सुपरफास्ट बुलडाणा
गुरुवार, दि. ४ जून २०२६
http://epaper.citynewssuperfast.com

# एमआरपी व्यवस्थेत सुधारणा करण्यात यावी- मागणी

**मलकापूर :** बाजारातील सध्याची एम. आर. पी. (कमाल किरकोळ किंमत) व्यवस्था ग्राहकांच्या संरक्षणाऐवजी शोषणाचे माध्यम बनत चालली असून, उत्पादकांकडून मनमानी पध्दतीने जास्त किंमती छापून ग्राहकांची फसवणूक केली जात आहे. यावर कार्यवाही करण्यात यावी, अशी मागणी अखिल भारतीय ग्राहक पंचायत, शाखा मलकापूरच्या वतीने ३ जून रोजी तहसीलदार यांचे मार्फत केंद्र व राज्य सरकारकडे केली आहे. दिलेल्या निवेदनात नमूद आहे की, एमआरपी व्यवस्थेत सुधारणा करण्यात यावी, ग्राहकांच्या संरक्षणासाठी कायदेशीर दुरुस्त्या करण्यात याव्यात, कंपन्यांच्या मनमानी छापण्यावर एमआरपी कायदेशीर बंदी घालण्यात यावी, याकरीता स्वतंत्र प्राधिकरणाची स्थापना करण्यात यावी, प्रत्येक उत्पादनावर एमआरपी सोबतच त्याचा प्रत्यक्ष उत्पादन खर्च लिहणे बंधनकारक करण्यात यावे, फसवणूक करणाऱ्यांवर कठोर दंडात्मक कारवाई करण्यात यावी. यासह आदी मागण्या या निवेदनात नमूद करण्यात आल्या आहेत. निवेदन देतेवेळी अखिल भारतीय ग्राहक पंचायतीचे तालुका अध्यक्ष दामोदर शर्मा, हरिभाऊ पाटील सर, के. एस. शर्मा, धर्मेश राजपूत, ॲड. व्यंकटेश पानमवार, पंकज मोरे, भिकु भोजने आदी उपस्थित होते.

# अन्नसुरक्षा योजनेच्या इष्टांकात वाढ; जिल्ह्यात 622 अंत्योदय कार्ड

## ३७,३०१ प्राधान्य कुटुंब लाभार्थ्यांची पडली भर

प्रतिनिधी ४ जून



**खामगाव:** राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम, २०१३ अंतर्गत पात्र लाभार्थ्यांना सवलतीच्या दरात अन्नधान्याचा लाभ देण्यासाठी राज्य शासनाने जिल्हानिहाय इष्टांकात सुधारणा करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. शिधापत्रिका व्यवस्थापन प्रणाली वरील अद्ययावत माहितीच्या आधारे हा निर्णय घेण्यात आला असून, यासंदर्भातील शासन निर्णय अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाने जारी केला आहे. या निर्णयानुसार बुलढाणा शिधापत्रिकांची वाढ करण्यात आली असून, प्राधान्य कुटुंब योजनेतील लाभार्थी संख्येत ३७ हजार ३०१ जणांची भर पडली आहे. जिल्ह्यात ६२२ अंत्योदय अन्न योजना राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियमाची महाराष्ट्रात १ फेब्रुवारी २०१४ पासून अंमलबजावणी सुरू करण्यात आली. या अधिनियमांतर्गत राज्यातील ग्रामीण भागातील ७६.३२ टक्के आणि शहरी भागातील ४५.३४ टक्के लोकसंख्येला सवलतीच्या दरात अन्नधान्य उपलब्ध करून देण्याची तरतूद आहे. त्यानुसार राज्यासाठी एकूण ७००.१६ लाख लाभार्थ्यांचा इष्टांक निश्चित करण्यात आला असून, त्यामध्ये ग्रामीण भागासाठी ४६९.७१ लाख आणि शहरी भागासाठी २३०.४५ लाख लाभार्थीचा समावेश आहे. यापूर्वी २०१३, २०१५, २०१६ तसेच २०२२ नंतर विविध शासन निर्णयांद्वारे जिल्हानिहाय इष्टांक निश्चित करण्यात आला होता. मात्र, अनेक वेळा इष्टांकात बदल आणि पुनर्निधोरण करूनही राज्यासाठी मंजूर लाभार्थी संख्येची पूर्ण पूर्तता होत नसल्याचे निदर्शनास आले. विशेषतः शिधापत्रिकांचे संगणकीकरण आणि लाभार्थ्यांच्या डिजिटल नोंदींच्या पडताळणीत अनेक जिल्ह्यांमध्ये इष्टांक अद्याप पूर्ण झाले नसल्याचे आढळून आले. या पार्श्वभूमीवर शिधापत्रिका व्यवस्थापन प्रणालीवर डिजिटायझेशन करण्यात आलेल्या अंत्योदय अन्न योजना आणि प्राधान्य कुटुंब योजनेतील लाभार्थ्यांच्या अद्ययावत संख्येच्या आधारे जिल्हानिहाय सुधारित इष्टांक निश्चित करण्यात आले आहे.

**कार्यपद्धतीचे काटेकोर पालन करण्याचे निर्देश**

शासन निर्णयानुसार, १ एप्रिल २०२५ रोजीच्या शासन निर्णयासोबत जोडलेले विवरणपत्र रद्द करण्यात आले आहे. त्याऐवजी नव्याने निश्चित करण्यात आलेल्या जिल्हानिहाय इष्टांकाच्या मर्यादेत अंत्योदय अन्न योजना आणि प्राधान्य कुटुंब योजनेतील लाभार्थ्यांची निवड करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. तसेच, क्षेत्रीय कार्यालयांनी सुधारित इष्टांकाची पूर्तता करताना कार्यपद्धतीचे काटेकोरपणे पालन करावे, शासनाने वेळोवेळी निश्चित केलेल्या असे निर्देशही देण्यात आले आहेत.

**जुलैमध्ये सुधारित इष्टांक देणार!**

राज्यातील शिल्लक इष्टांकाचा नियमित आढावा घेऊन दरवर्षी जानेवारी आणि जुलै महिन्यात इष्टांकाचे पुनर्वाटप करण्यात येणार आहे. त्यामुळे पात्र लाभार्थ्यांना अन्नसुरक्षा योजनेचा लाभमिळवून देण्यासाठी अधिक गतिमान, पारदर्शक आणि परिणामकारक व्यवस्था निर्माण होण्यास मदत होणार असल्याचे मानले जात आहे.

# भूमिअभिलेख संगणकीकरणातील त्रुटींमुळे हजारो मालमत्ताधारक अडचणीत !

## चिखलीत मालमत्ता व्यवहार ठप्प, नागरिक त्रस्त !

प्रतिनिधी ४ जून

**चिखली:** भूमिअभिलेख विभागाच्या संगणकीकरण प्रक्रियेतील गंभीर त्रुटींमुळे शहरातील हजारो मालमत्ताधारक अडचणीत सापडले आहेत. शहरातील विविध नझूल शीट क्रमांकांची माहिती ऑनलाइन प्रणालीमध्ये चुकीच्या पद्धतीने केवळ नझूल शीट क्रमांक ०१ अंतर्गत नोंदविण्यात आल्याने मूळ अभिलेख आणि डिजिटल नोंदींमध्ये मोठी तफावत निर्माण झाली आहे. या त्रुटीमुळे अनेक मालमत्तांची पीआर कार्डे ऑनलाइन उपलब्ध होत नसल्याने फेरफार, नाव दुरुस्ती आणि इतर महसुली प्रक्रिया रखडल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.याबाबत मनसेचे जिल्हाध्यक्ष गणेश बरबडे यांनी आंदोलनाचा इशारा दिला आहे. शहरातील सर्व नझूल शीट क्रमांक व प्लॉट क्रमांकांची माहिती मूळ अभिलेखांशी पडताळून त्यांची १५ दिवसांच्या आत दुरुस्ती करा, तसेच शून्य किंवा चुकीचे क्षेत्रफळ दाखविणाऱ्या सर्व 'पीआर कार्ड' त्वरित अद्ययावत करा, ७/१२ प्रमाणेच 'पीआर कार्ड' फेरफार प्रणाली 'आयजीआर' शी प्रभावीपणे जोडा आणि या चुकीस जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाईची मागणी करण्यात आली असून १५ दिवसांत प्रशासनाने ठोस कार्यवाही न झाल्यास आंदोलनाचा इशारा दिला. प्रवीण देशमुख, संजय दळवी, अंकित इंगळे, विष्णू झाल्टे आदी उपस्थित होते.पीआर कार्डवरील क्षेत्रफळ ऑनलाइन नोंदीत 'शून्य'!

धक्कादायक बाब म्हणजे अनेक मालमत्तांच्या 'पीआर कार्ड'मध्ये प्रत्यक्ष क्षेत्रफळ असतानाही ऑनलाइन नोंदीत ते थेट 'शून्य' दाखविले जात आहे. त्यामुळे मालमत्तांचे कायदेशीर व्यवहार अडचणीत आले असून, खरेदीदार आणि विक्रेत्यांना प्रशासनाच्या चुकीची शिक्षा भोगावी लागत आहे. अनेक आर्थिक व्यवहार अडकले आहेत.

# वन जमिनीतून ५६ ब्रास मुरुमाचे अवैध उत्खनन!

## भादोला वन बिटमधील धडक कारवाई; तीन आरोपी अटकेत

प्रतिनिधी ४ जून

**बुलढाणा:** गौण खनिजांच्या अवैध उत्खननाचे जाळे आता थेट वनजमिनीपर्यंत पोहोचल्याचे भादोला येथील कारवाईतून समोर आले आहे. बुलढाणा वन परिक्षेत्रातील भादोला वन बिटमध्ये मुरुमाचे बेकायदेशीर उत्खनन करून त्याची वाहतूक केल्याप्रकरणी वन विभागाने मोठी कारवाई करत तीन आरोपींना अटक केली आहे. या कारवाईत दोन ट्रॅक्टर-ट्रॉली, एक जेसीबी आणि अन्य साहित्य, असा सुमारे १९ लाख ५० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

भादोला बिटमधील कक्ष क्रमांक ५२३ मध्ये वनजमिनीतून मुरुमाचे अवैध उत्खनन सुरू असल्याची माहिती वन विभागाला मिळाल्यानंतर विभागीय वन अधिकारी जमीर शेख यांनी तातडीने कारवाईचे आदेश दिले. सहायक वनसंरक्षक वैभव काकडे आणि वनपरिक्षेत्र अधिकारी सुनील वाकोडे यांच्या मार्गदर्शनाखाली पथकाने तपास सुरू केला. या प्रकरणी संबंधितांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला.तपासादरम्यान गावातील नव्याने

बांधण्यात आलेल्या सिमेंट रस्त्याच्या साईड पट्ट्यांसाठी वनक्षेत्रातून मुरूम काढण्यात आल्याचे उघड झाले. त्यानंतर आरोपींचा शोध घेऊन महेश भीमराव जाधव (वय ४०), योगेश वसंतराव एकडे (वय ४१, दोघे रा. भादोला) आणि विजय रामा इटकर (वय ३१, रा. पिंपरखेड) यांना अटक करण्यात आली. कारवाईमध्ये यांचा सहभाग कारवाईत वनपाल प्रदीप मुंढे, वनरक्षक नितेश गवई, समाधान झोटे, गजानन शिंदे, गजानन पोटे, विक्रम राऊत, बाळासाहेब घुले तसेच वनमजूर रवींद्र तायडे, दीपक सोनुने, पवन मुळे, अमोल चव्हाण आणि प्रवीण सोनवणे यांनी सहभाग घेतला. वन विभागाच्या चौकशीत वनखंड क्रमांक ५२३ मधून तब्बल ५६ ब्रास मुरुमाचे अवैध उत्खनन झाल्याचे स्पष्ट झाले आहे. संबंधितांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

# महिनाभरानंतर मृतदेह बाहेर काढून फॉरेन्सिक तपासणी!

## राजुरा येथे शीरविरहित महिलेच्या हत्या प्रकरणात तपासाला वेगः मृत महिलेची ओळख पटविण्याचे आव्हान कायम !

प्रतिनिधी ४ जून

**जळगाव जामोद:** तालुक्यातील राजुरा येथील शीरविरहित महिलेच्या संशयास्पद मृत्यू प्रकरणाच्या तपासाला आता वेग आला असून, तपासातील एक महत्त्वाचा टप्पा बुधवारी पूर्ण झाला. या प्रकरणात २ मे रोजी जळगाव जामोद येथील स्मशानभूमीत दफन करण्यात आलेला महिलेचा मृतदेह तब्बल महिनाभरानंतर ३ जून रोजी पुन्हा बाहेर काढून त्याची सखोल फॉरेन्सिक तपासणी करण्यात आली.

तपासाच्या अनुषंगाने मलकापूर येथील फॉरेन्सिक तज्ज्ञांचे विशेष पथक जळगाव जामोद येथे दाखल झाले होते. दुपारी साडेचार वाजताच्या सुमारास 'जेसीबी'च्या साहाय्याने दफन केलेला मृतदेह बाहेर काढण्यात आला. त्यानंतर फॉरेन्सिक तज्ज्ञांनी मृतदेहातील विविध जैविक नमुने, हाडांचे अवशेष तसेच तपासासाठी आवश्यक अन्य पुरावे संकलित केले. या संपूर्ण कारवाईवर वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांचे बारकाईने लक्ष होते.

घटनास्थळी अमरावती परिक्षेत्राचे विशेष पोलिस महानिरीक्षक महेश पाटील, पोलिस अधीक्षक नीलेश तांबे, अप्पर पोलिस अधीक्षक श्रेणिक लोढा, तपास अधिकारी तथा मेहकरचे उपविभागीय पोलिस अधिकारी संतोष खाडे, मलकापूरचे उपविभागीय पोलिस अधिकारी आनंद महाजन, जळगाव जामोद पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक सचिन बागुल, तहसीलदार पवन पाटील, राजुरा गावचे पोलिस पाटील तसेच मोठ्या संख्येने पोलिस अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

फॉरेन्सिक तपासणी पूर्ण झाल्यानंतर वरिष्ठ अधिकाऱ्यांनी घटनास्थळाची पाहणी करून तपासाच्या पुढील दिशेबाबत चर्चा केली. सुरुवातीपासूनच या प्रकरणातील अनेक प्रश्न अनुत्तरित राहिल्याने पोलिसांकडून प्रत्येक बाब नव्याने पडताळून पाहिली जात आहे. या नव्या घडामोडींमुळे राजुरा परिसरात पुन्हा एकदा चर्चांना उधाण आले असून, फॉरेन्सिक अहवालातून कोणते नवे धागेदोरे समोर येतात, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.तपासासाठी महत्त्वाचे ठरणारे नमुने प्रयोगशाळेकडे पाठविण्यात येणार असून, त्यातून मृत्यूचे नेमके कारण आणि मृत महिलेची ओळख पटविण्यास मदत होण्याची शक्यता आहे. मृत महिलेची ओळख अद्याप निश्चित झालेली नसल्याने पोलिसांसमोर सर्वात मोठे आव्हान कायम आहे. महिलेबाबत अथवा तिच्या ओळखीबाबत खात्रीशीर माहिती देणाऱ्या व्यक्तीस ५० हजार रुपयांचे रोख बक्षीस जाहीर करण्यात आले आहे. त्यामुळे नागरिकांनी पुढे येऊन माहिती द्यावी, असे आवाहन पोलिसांकडून करण्यात आले आहे.

# संग्रामपूर तालुक्याला वादळाचा फटका; ४४३७ हे. शेती बाधीत, संत्रा, केळी पिकाचे नुकसान

प्रतिनिधी ४ जून

**सोनाळा :** सोमवार १ जून संध्याकाळी तासभर च्या तालुक्यात सातपुडा व पायथ्याशी चक्रीवादळाने मोठा तडाखा दिला उपरोक्त मान्सून पूर्व वादळी वाऱ्यासह पावसाने संग्रामपूर तालुक्यातील शेतकऱ्यांची भिषण त्रेधाटिपट उडविली. या वादळाच्या कोहराम मध्ये संत्रा व केळी जमिन दोस्त झाली आहे. ७४ गावातील ४६५६ शेतकऱ्यांचे ४४३७. ६ हेक्टर क्षेत्र बाधीत झाले आहे. यात २५३७ शेतकऱ्यांचे २२८३ हेक्टर संत्रा पिकाचे नुकसान झाले. २०८३ शेतकऱ्यांच्या २१२३ हेक्टर क्षेत्रावरील केळी पिक मातीत गेले. लिंबू च्या ३२ शेतकऱ्यांचे २८ हेक्टर क्षेत्र बाधीत झाले. आंबा १ शेतकरी १ हेक्टर, पपई २ शेतकरी व त्याचे क्षेत्र २..६ हेक्टर आहे. असा प्राथमिक अहवाल संग्रामपूर तालुका प्रशासनाने ३ जून रोजी तातडीने जिल्हा प्रशासनाला सादर केला आहे. तत्पूर्वी २ जून ला जळगाव जामोद एसडीओ शैलेश काळे यांनी अनेक शेतात जावून पिक नुकसानी चा प्रत्यक्ष आढावा घेतला. तदनंतर

संग्रामपूर तहसिलदार प्रशांत पाटील, तालुका कृषी अधिकारी जाधव यांनी बांधावर जात शेत जमीन नुकसान बधीतले. त्यानंतर तहसिलदार बीडीओ व तालुका कृषी अधिकारी यांच्या स्वाक्षरीने जिल्हा प्रशासनाला प्राथमिक अहवाल सादर केला आहे. केवळ एका तासात झालेल्या

निसर्ग तांडवाने शेतीचे न भरून नुकसान झाले आहे.



संग्रामपूर हा शेती बहुल तालुका आहे. या तालुक्याचे भौगोलीक क्षेत्र ५००२० हेक्टर आहे तर वहिती खाली क्षेत्र ४३८२१ हेक्टर एवढे आहे.

तालुक्यात ५ महसुली मंडळ आहेत या तील बहुतांश मंडळातील ७४ गावात वादळाने तांडव करित शेतकऱ्यांची दाणादाण केली गेल्या ४ वर्षापासून अस्मानी संकटामुळे बळीराजाचे अर्थचक्र चिखलात रुतले आहे. अस्मानी व सुलतानी संकटाने शेतकरी मोठ्या संकटात सापडला आहे. शेतीत वादळी वारे, दरवर्षीची अतिवृष्ठी यामुळे शेतकरी रडकुंडी ला आला आहे. आता तर खरिप हंगाम डोक्यावर आहे एकीकडे कर्जमाफी तुर्त झाली नाही त्यामुळे बँकांची कवाडे शेतकऱ्यांना बंद आहेत. अशा स्थितीत शासनाने तातडीची नुकसान भरपाई द्यावी अशी मागणी आहे.

# अखेर एलसीबी पीएसआयसह ४ पोलीस निलंबित

प्रतिनिधी ४ जून

**खामगाव :** शिर विरहीत तरुणीच्या खून प्रकारणातील तपासाच्या भोंगळपणाची किंमत अखेर स्थानिक गुन्हे शाखेला चुकवावी लागली आहे. कारण तपास पथकातील पी. एस.आय. यांचेसह चार पोलीस कर्मचाऱ्यांना अखेर जिल्हा पोलीस अधिक्षक तांबे यांनी निलंबित केले आहे.

जळगाव जामोद तालुक्यातील राजुरा शिवारात २५ एप्रिल रोजी शिर विरहित तरुणीचे प्रेत आढळून आले होते. हे प्रेत मध्यप्रदेशातील शिवानी

कळमेकर हिचे असल्याचा शोध या तपास अधिकाऱ्यांनी लावला होता व तिच्या खुनाच्या आरोपात चक्क तिचे वडीलव भावाला अटक केली होती. परंतु ही तरुणी २८ मे रोजी जळगाव जामोद पोस्टेला हजर झाली. त्यामुळे या खुनाच्या तपासातील भोंगळपणाची चर्चा होऊ लागली. याप्रकरणी स्थागुशाखेचे पीएसआय पंकज सपकाळे, पोलीस अमलदार अजित रहेमान परशुवाले, एजाज रफिक खान आणि अमोल शेजोळे यांना प्रथम नियंत्रण कक्षामध्ये जमा करण्यात आले होते. परंतु पोलिसांची ही गंभीर चूक पाहता बदलीचीही छोटी कारवाई होती. दरम्यान पोलीस प्रशासनाच्या या तपासाची धिंडवडे सर्वत्र उडत असतांनाच २ जून रोजी पोलीस अधिक्षक तांबे यांनी उपरोक्त पोलीस उपनिरीक्षक यांच्यासह चारही पोलीस कर्मचाऱ्यांना निलंबित केले आहे.

# विजेचे खांब, रोहित्रांवरील बेकायदेशीर जाहिरातबाजी थांबविण्याचे निर्देश

प्रतिनिधी ४ जून

**नांदुरा :** शहरातील महावितरणच्या विद्युत खांबांवर व रोहित्रांवर (डीपी) विनापरवानगी जाहिरात फलक लावण्याच्या प्रकाराबाबत अखेर महावितरण प्रशासनाने गंभीर दखल घेतली आहे. या पार्श्वभूमीवर महावितरणच्या नांदुरा शहर शाखेचे सहाय्यक अभियंता यांनी नगर परिषद मुख्याधिकाऱ्यांना अधिकृत पत्र पाठवून अशा अनधिकृत जाहिरातबाजीवर तातडीने कारवाई करण्याची विनंती केली आहे.

महावितरणने पाठविलेल्या पत्रात नमूद करण्यात आले आहे की, शहरातील विविध चौक, सार्वजनिक ठिकाणे तसेच महावितरणच्या अखत्यारितील विद्युत खांब व रोहित्रांवर मोठ्या प्रमाणात विनापरवानगी जाहिरात फलक लावले जात आहेत. यामुळे विद्युत यंत्रणांच्या सुरक्षिततेला बाधा निर्माण होण्याबरोबरच देखभाल व दुरुस्तीची कामे करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या जीवितासही धोका निर्माण होऊ शकतो.

तसेच जाहिरात फलक लावताना किंवा काढताना विद्युत अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नसल्याचेही पत्रात स्पष्ट करण्यात आले आहे. त्यामुळे सामाजिक कार्यकर्ते, लोकप्रतिनिधी, विविध संस्था व नागरिकांनी विद्युत खांब व रोहित्रांवर कोणत्याही प्रकारचे अनधिकृत फलक लावू नयेत, याबाबत नगर परिषदेमार्फत सूचना देण्याची विनंती करण्यात आली आहे.

या पत्राची प्रत पोलीस स्टेशन नांदुरा, विद्युत निरीक्षक कार्यालय खामगाव, कार्यकारी अभियंता मलकापूर तसेच उपकार्यकारी अभियंता नांदुरा यांनाही पाठविण्यात आली आहे. महावितरणने घेतलेली ही दखल महत्त्वाची मानली जात असून, यामुळे भविष्यात अशा प्रकारांना आळा बसणार का, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

# शासकीय वसतिगृहात ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया सुरू

प्रतिनिधी ४ जून

**मेहकर :** सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागांतर्गत क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले मुलींचे शासकीय वसतिगृह, मेहकर येथे शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.

प्रवर्गनिहाय आरक्षित टक्केवारीनुसार अनुसूचित जाती, जमाती, विमुक्त जाती-भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग तसेच आर्थिकदृष्ट्या मागास प्रवर्गातील शालेय (इयत्ता ८ वी वरील), कनिष्ठ महाविद्यालयीन तसेच व्यावसायिक व तांत्रिक शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थिनी प्रवेशासाठी अर्ज करू शकतात. वसतिगृहात सर्व सोयी-सुविधा मोफत उपलब्ध असून प्रवेशासाठी विद्यार्थिनींनी गुणपत्रिका, शाळा सोडल्याचा दाखला, वयाचा पुरावा, जात प्रमाणपत्र, शाळा किंवा महाविद्यालयाचे बोनाफाईड प्रमाणपत्र, उत्पन्नाचा दाखला, आधार कार्ड, पासपोर्ट आकाराचे छायाचित्र आदी आवश्यक कागदपत्रे सादर करावीत. प्रवेशासाठी इच्छुक विद्यार्थिनींनी httped://hmas.mahait.org या संकेतस्थळावर जाऊन ऑनलाईन अर्ज करावा. तसेच प्रवेश प्रक्रियेबाबत अधिक माहितीसाठी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले मुलींचे शासकीय वसतिगृह, मेहकर येथे संपर्क साधावा, असे आवाहन वसतिगृह प्रशासनाने केले आहे.

# सिं. राजात उद्या पंडित दीनदयाल उपाध्यक्ष रोजगार मेळावा

प्रतिनिधी ४ जून

**बुलढाणा :** जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र तथा मॉडेल करिअर सेंटर, बुलढाणा आणि राजमाता पॅरामेडिकल कॉलेज, सिंदखेडराजा यांच्या संयुक्त विद्यमाने पंडित दीनदयाल उपाध्याय रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.

हा रोजगार मेळावा ५ जून रोजी सकाळी ९.३० वाजता राजमाता पॅरामेडिकल कॉलेज, मेहकर रोड, सिंदखेडराजा येथे आयोजित करण्यात आला आहे. मेळाव्यात क्विझ कॉर्पोरेशन, नागपूर यांच्या माध्यमातून महानगर गॅस लिमिटेड, मुंबई आणि टाटा मोटर्स, पुणे या नामांकित कंपन्यांनी विविध रिक्त पदांसाठी उमेदवारांची भरती प्रक्रिया राबविणार आहेत. या रोजगार मेळाव्यात १० वी, १२ वी, आयटीआय, पदवीधर तसेच एऊंझ् अंतर्गत प्रशिक्षण पूर्ण केलेले पुरुष व महिला उमेदवार सहभागी होऊ शकतात. इच्छुकांनी आवश्यक शैक्षणिक कागदपत्रांसह ५ जून रोजी सकाळी ९.३० वाजता स्वखर्चाने उपस्थित राहून नोंदणी करावी जिल्ह्यातील पात्र, गरजू व रोजगार इच्छुक युवक-युवतींनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राचे सहायक आयुक्त ग. प्र. बिटोडे यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी दूरध्वनी क्रमांक (०७२६२) २४२३४२ वर संपर्क साधावा.

# आयुष्मान भारत व आभा कार्ड नोंदणी शिबिराचे आयोजन

## नगराध्यक्ष तायडे यांचे नागरिकांना लाभघेण्याचे आवाहन

प्रतिनिधी ४ जून

**सिंदखेडराजा :** शहरातील सर्व नागरिकांना आरोग्याविषयी विविध शासकीय योजनांचा लाभ मिळावा, या उद्देशाने स्थानिक नगर परिषदेच्या वतीने शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

१ ते १५ जून या कालावधीत संपूर्ण सिं. राजा शहर हद्दीत 'आयुष्मान भारत कार्ड, आभा कार्ड नोंदणी तसेच वय वंदना कार्ड' काढण्यासाठी प्रभाग निहाय शिबिरे हा उपक्रम राबविण्यात येत आहेत.

मुख्याधिकारी, न. प. सिंदखेडराजा यांनी शहरातील सर्व १ ते १० प्रभागांमधील नागरिकांपर्यंत या योजनेचा लाभ पोहोचवण्यासाठी नियोजन केले आहे. आरोग्य निरीक्षक व शहर समन्वयक यांच्या माध्यमातून हे शिबिर यशस्वीरीत्या पार पाडण्यासाठी विशेष प्रयत्न केले जात आहेत.

**५ लाख रुपयांपर्यंत मोफत उपचार**

पात्र लाभार्थ्यांना गंभीर आजारांवर वर्षभरात ५ लाख रुपयांपर्यंत मोफत वैद्यकीय उपचार मिळतील. हे कार्ड देशातील कोणत्याही अंगीकृत रुग्णालयात उपचारासाठी वैध असेल. रुग्णालयात दाखल झाल्यानंतर उपचाराचा खर्च थेट शासनामार्फत केला जाईल. डिजिटल आरोग्य रेकॉर्ड (आभा आयडी) नागरिकांचे आरोग्य रेकॉर्ड डिजिटल स्वरूपात सुरक्षित राहील.

वय वंदना कार्ड: ज्येष्ठ नागरिकांसाठी विशेष वय वंदना कार्डही या शिबिरात काढता येणार आहे.

**शिबिराची वेळ व ठिकाण :** कालावधी : १ ते १५ जून दरम्यान सकाळी १० ते दुपारी २ वाजेपर्यंत शहरातील संबंधित प्रभागांम शिबिर आयोजित केले आहे. या शिबिराचा लाभघेण्यासाठी नागरिकांनी सोबत आधारकार्ड, रेशनकार्ड आणि मोबाईल क्रमांक घेऊन येणे बंधनकारक आहे.

# लेखी आश्वासनाने साखळी उपोषणाची सांगता

**मेरा बु. :** मनुबाई ते अंढेरा या जोड रस्त्यासाठीष्मनुबाई येथील ग्रामस्थांनी २९ मेपासून रोडवर मंडप टाकून साखळी उपोषण सुरु केले होते. या उपोषणाच्या चौथ्या दिवशी अचानक सायंकाळच्या ८ वाजेच्या दरम्यान वादळी वारे सुटल्याने मंडप हवेत उडू लागला. उपोषण कर्त्यांना मोठ्या संकटाचा सामना करावा लागल्याने उपोषण कर्त्यांची प्रकृती खालावली. या घटनेची बातमी दैनिक देशोन्नतीमध्ये प्रकाशीत झाली. बातमी प्रकाशीत होताच तहसीलदर सवडे, ठाणेदार शक्करगे, मंडळ अधिकारी, तलाठी यांनी उपोषणस्थळी भेट देवून लेखी आश्वासनाने साखळी उपोषणाची सांगता करण्यात आली.

या रस्त्याचे खडीकरण यापूर्वी मंजूर झाले होते, तसेच आता यावर्षी मातोश्री पांदन रस्ता योजने अंतर्गत रस्त्याचे खडीकरण मंजूर झाले मात्र रस्त्यावरील काही लोकांनी कामास अडथळा निर्माण करून काम बंद पाडले. त्यामुळे ग्रामस्थांनी २९ मे पासून मनुबाई ते अंढेरा हा जोड रस्त्यासाठी साखळी आमरण उपोषण सुरु केले होते.

सिटी न्यूज सुपरफास्ट वऱ्हाड

गुरुवार, दि. ४ जून २०२६

http://epaper.citynewssuperfast.com

# गुटख्याची विक्री, वाहतूक करणाऱ्या सोबतच आता कंपनी मालकावर होईल कारवाई

प्रतिनिधी ४ जून

♦ अन्न व औषध विभागाच्या आयुक्तांचे निर्देश



**अकोला :** राज्यात गुटखा बंदी असताना सुद्धा सर्रासपणे सर्वत्र गुटखा मिळतो गुटख्यावर कारवाईचे आदेश आदेश असल्यावरही गुटख्याची विक्री थांबलेली नाही गुटखा विक्री करणाऱ्या टोळ्या जिल्ह्यात सक्रिय असून परराज्यातून गुटखा आणून जिल्ह्यात विक्री केली जात आहे. परंतु आता अवैध गुटखा विक्रेत्यांच्या मुस्क्या आवडण्यासाठी अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंडे यांनी धडाकेबाज निर्णय घेतला आहे गुटक्यावर कारवाई करताना थेट कंपनी मालकाविरोधात गुन्हे दाखल करून त्यांना आरोपी करा असे स्पष्ट आदेश अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंडे यांनी दिले असल्याची माहिती आहे यापूर्वी केवळ गुटख्याची वाहतूक तसेच विक्री करणाऱ्या विरोधात कारवाई होत होती मात्र आता गुटखा कंपनीच्या मालकावर कारवाई केली जाणार आहे अन्न व औषध प्रशासनाच्या आयुक्त पदाचा पदभार स्वीकारल्यानंतर मुंडे यांनी राज्यात धडाकेबाज कारवाया सुरू केल्या आहेत आता राज्यातील गुटखा व पान मसाल्यावर कारवाई करण्याचा त्यांनी आदेश दिला आहे त्यांच्या आदेशानुसार राज्यात ठीक ठिकाणी छापे टाकून गुटखा जप्त करण्यात येत आहे राज्यात गुटखा विक्रीस बंदी आहे असे असताना कर्नाटक गुजरात तसेच मध्यप्रदेशातून गुटका महाराष्ट्रात विक्रीसाठी आणला जातो बुटक्याची वाहतूक करणाऱ्यांवर गुन्हे दाखल करण्यात येतात मात्र मूळ मालकांवर कारवाई होत नाही कारवाईदरम्यान जप्त केलेल्या गुटक्यावर कंपनीचे नाव व पत्ता ही असतो परंतु त्या दिशेने तपास होत नाही फक्त वाहतूक करणाऱ्यांवरच कारवाई होते आता थेट गुटक्याच्या कंपनी मालकाविरोधात गुन्हे दाखल करण्यात येणार असून गुटकाबंदीची कड़क अंमलबजावणी केली जाणार आहे शहरात तसेच जिल्ह्यात अनेकदा पोलिसांनी छापा टाकत गुटखयाचा माल पकडला आहे. विक्री करणाऱ्यांना तसेच वाहतूक करणाऱ्यांना अटक सुद्धा करण्यात आली आहे मात्र हा गुटखा कुठून आला कोणत्या कंपनीत तयार झाला याचा शोध घेण्याची तसदी पोलिसांनी घेतली नाही यापुढे गुन्हा दाखल करताना कंपनीच्या नावाचा उल्लेख केला जाणार असून कंपनी मालकांना आरोपी केले जाणार आहे.

### अकोला शहरात गुटख्याची मोठ्या प्रमाणात विक्री

अकोला शहरात तसेच जिल्ह्यातही गुटख्याची सर्रास विक्री होत आहे विविध कंपन्यांचा गुटखा सर्वत्र उपलब्ध आहे अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांनी गुटखा विकत्यांवर कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत मात्र शहरातील अन्न व औषध प्रशासनाच्या अधिकाऱ्यांनी ढिम्म भूमिका घेतली आहे. गुटखा तर सोडा साध्या फळ विक्रेत्यांवर सुद्धा कारवाई केली जात नाही. अन्न व औषध विभागाच्या आयुक्तांनी आदेश दिल्यानंतरही शहरात गुटख्याची विक्री थांबलेली नाही गुटखा विक्री करणाऱ्या टोळ्या जिल्ह्यात सक्रिय असून पर राज्यातून गुटखा आणून ग्रामीण भागात तसेच शहरात विक्री केली जात आहे

# कृषी विभागाची धडक कारवाई

प्रतिनिधी ४ जून

♦ ७ कृषी सेवा केंद्रांचे परवाने कायमस्वरूपी रद्द, ३ निलंबित

**अकोला :** खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांची फसवणूक टाळण्यासाठी कृषी विभागाने जिल्ह्यात कृषि निविष्ठा विक्रीत अनियमितता आढळल्याने जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी मोठी कार्यवाही केली असून तपासणी आणि सुनावणीअंती ७ कृषी सेवा केंद्रांचे परवाने कायमस्वरूपी रद्द करण्यात आले आहेत. त्याचप्रमाणे, ३ केंद्रांचे परवाने १ ते २ महिन्याकरिता निलंबित करण्यात आले आहेत. तर इतर ६ केंद्रांना त्रुटीं बाबत सक्त ताकीद देण्यात आली आहे. या कारवाईमुळे नियमबाह्य व्यवसाय करणाऱ्या केंद्रचालकांमध्ये मोठी खळबळ उडाली आहे.

**या कृषी केंद्रांवर झाली कठोर कारवाई**

तपासणी व सुनावणी दरम्यान समाधानकारक खुलासा, स्पष्टीकरण न देऊ शकल्याने अकोट तालुक्यातील बोर्डी येथील राय कृषी सेवा केंद्र, अकोली जहाँगीर येथील मोहन ट्रेडर्स, तेल्हारा तालुक्यातील तळेगाव बु. येथील महालक्ष्मी कृषी सेवा केंद्र, पातूर तालुक्यातील सस्ती येथील शिवशक्ती ?ग्रोटेक, पातूर येथील खानापूर रस्त्यावरील शेतकरी कृषी सेवा केंद्र, वाडेगाव येथील बळीराजा कृषी सेवा केंद्र आणि बादलापूर येथील जगदंब ॲग्रो एजन्सीज व ॲग्रोटेक या सात केंद्रांचे परवाने कायमस्वरूपी रद्द करण्यात आले आहेत. त्याचप्रमाणे, बाळापूर तालुक्यातील निंबा फाटा येथील आपलं ग्रोमर कृषी सेवा केंद्र यांचे एका महिन्यासाठी, तेल्हारा तालुक्यातील वारखेड येथील शेतकरीपुत्र कृषी सेवा केंद्राचे दोन महिन्यासाठी व कापशी रोड येथील मातोश्री कृषी सेवा केंद्राचे एका महिन्यासाठी परवाना निलंबन करण्यात आले आहे.

कृषी अधिकारी (गुणनियंत्रण) तालुका कृषि अधिकारी कार्यालय व कृषी अधिकारी, पंचायत समिती यांनी आपल्या कार्यक्षेत्रातील विविध कृषी केंद्रांची अचानक तपासणी केली होती. या मोहिमेत एकूण १६ कृषी केंद्रांमध्ये गंभीर व नियमबाह्य बाबी आढळून आल्या. 'इ-पॉस' (I-इदए) मशीनमधील अधिकृत साठा आणि प्रत्यक्ष दुकानात उपलब्ध असलेला साठा यात मोठी तफावत आढळली. दुकानात साठा फलक आणि चालू दर फलक अद्ययावत ठेवले नव्हते. तसेच, शेतकऱ्यांना अधिकृत 'पक्की बिले' न देणे किंवा दिलेली बिले विहित नमुन्यात नसणे, केंद्राचे अधिकृत परवाना/नोंदणी प्रमाणपत्र ग्राहकांना दिसेल अशा ठिकाणी न लावणे या त्रुटींच्या अनुषंगाने जिल्हा स्तरावर घेण्यात आलेल्या सुनावणीत उचित खुलासा उत्तर न मिळाल्याने ही कडक कारवाई करण्यात आली. कृषी विभागाने दिलेल्या माहितीनुसार, जिल्ह्यात खरीप हंगामासाठी पुरेसा खत आणि बियाणे साठा उपलब्ध आहे. मात्र, फसवणूक टाळण्यासाठी शेतकऱ्यांनी खरेदी करताना खालील गोष्टींची काळजी घ्यावी. खरेदी केल्यानंतर विक्रेत्याकडून विहित नमुन्यातील पक्के बिल आवर्जून मागावे. बिलावर लॉट नंबर, बॅच नंबर आणि योग्य किंमत लिहिलेली आहे का, याची शहानिशा करा. नेहमी नामांकित आणि नोंदणीकृत कंपन्यांच्याच कृषी निविष्ठांना प्राधान्य द्यावे.

**तक्रार कोठे करावी?**

♦ जर कोणत्याही कृषी केंद्रचालकाने बियाणे किंवा खतांचा काळाबाजार केला, जादा दराने विक्री केली किंवा पक्के बिल देण्यास नकार दिला, तर शेतकऱ्यांनी त्वरित आपल्या तालुक्यातील पंचायत समिती किंवा तालुका कृषी अधिकारी कार्यालयातील 'तक्रार निवारण कक्षात' संपर्क साधावा, लेखी तक्रार करावी असे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी केले आहे.

# समृद्धी महामार्गावर शेलू बाजार ते मालेगाव जवळ संजय ट्रॅव्हल्सची ट्रकला धडक, 15 प्रवासी जखमी

प्रतिनिधी ४ जून



**वाशिम :** वाशिमच्या समृद्धी महामार्गावर शेलू बाजार ते मालेगाव दरम्यान आज पहाटे एका लक्झरी ट्रॅव्हल्सने समोरील ट्रकला धडक दिल्यामुळे भीषण अपघात झाल्याची घटना घडली.या अपघातात ट्रॅव्हल्स मधील १५ प्रवासी जखमी झाले असून चार जणांची प्रकृती चिंताजनक असल्याची माहिती आहे.वाशीम जिल्ह्यातील समृद्धी महामार्गावरून संजय ट्रॅव्हल्स कंपनीची बस नागपूरहून पुण्याकडे जात होती.दरम्यान आज पहाटे २ ते ३ च्या सुमारास मालेगाव ते शेलुबाजार जवळ असलेल्या कवरदरी येथे या लक्झरी ट्रॅव्हल्सने समोरील एका ट्रकला जोरदार धडक दिली.या भिषण अपघातात ट्रॅव्हल्स मधील १५ प्रवासी जखमी झाले असून चालक आणि क्लिनरसह दोन प्रशांची प्रकृती चिंताजनक असल्याची माहिती समोर आली. घटनेची माहिती मिळताच महामार्ग पोलीस, बचाव पथक व आपत्कालीन सेवा घटनास्थळी दाखल झाले.जखमींना तातडीने वाशीम आणि अकोला येथील खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले असून त्यांच्या उपचार सुरू आहे.चालकाचे बसवरील नियंत्रण सुटल्याने हा अपघात झाल्याची प्राथमिक माहिती आहे.

# वादळ वाऱ्यामुळे केळी उत्पादकांचे नुकसान

प्रतिनिधी ४ जून

♦ शासनाकडे मदतीची मागणी



**बाळापूर :** अचानक आलेल्या सोसाट्याच्या वाऱ्याने केळी उत्पादक शेतकऱ्यांचे लाखोचे नुकसान झाले. १ जून रोजी संध्याकाळी वादळी वारा केळी उत्पादक शेतकऱ्यांच्या मेहनतीवर पाणी फिरवणारा ठरला. पीक काही दिवसातच काढणीला येणार होते.

पण वादळ वाऱ्याचा केळीच्या संपूर्ण पिकाला जबरदस्त फटका बसला. यामुळे बाळापुर तालुक्यासह जिल्ह्यातील केळी उत्पादक शेतकरी हा निसर्गाच्या या लहरीपणाला बळी पडला आहे. शासनाने काही प्रमाणात बुडत्याला काठीचा आधार याप्रमाणे लवकरात लवकर मदत जाहीर करावी व या अडचणीच्या काळात शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहावे हीच आशा केळी उत्पादक शेतकरी मनाशी बाळगून आहेत. एक निवेदन बाळापुर तालुक्यातील केळी उत्पादक शेतकऱ्यांनी तहसीलदार वैभव फरताळे यांना देण्यात आले. जिल्ह्यातील केळी उत्पादक शेतकऱ्यांना या पिकासाठी पिक विमा लागू करून शासकीय संरक्षण मिळावे अशी अपेक्षा केली.

# शासकीय कार्यालयातील वॉटर कुलर रिकामे

प्रतिनिधी ४ जून

♦ महिला व बालकल्याण विभागातील प्रकार

**अकोला :** शहरातील संतोषी माता मंदिर जवळील महिला व बाल कल्याण विभाग कार्यालयात पिण्याचे पाणी उपलब्ध नसल्याने या ठिकाणी येणाऱ्या नागरिकांना पाण्याच्या शोधात वनवन भटकावे लागत आहे. महिला व बालकल्याण दोन वॉटर कुलर बसविण्यात आले, परंतु दोन्ही वॉटर कुलर मध्ये पिण्याचे पाणी उपलब्ध नाही. त्यामुळे या कार्यालयात येणारे नागरिक चांगलेच वैतागले आहेत. गेल्या काही दिवसांपासून महिला व बालकल्याण विभाग कार्यालयात लाडकी बहीण योजनेच्या कामासाठी महिला आपल्या मुलांसह कार्यालयात तासंतास बसून राहतात, या ठिकाणी येणाऱ्या महिलांना पिण्याचे पाणी उपलब्ध नसल्याने त्यांना चांगलाच त्रास सहन करावा लागत आहे. एकीकडे या कार्यालयात कामकाज करणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी पाण्याची कॅन ची व्यवस्था करण्यात आली आहे, तर दुसरीकडे कामकाजाकरता येणारे नागरिक तसेच तहानलेले दिसून येत आहेत. या ठिकाणी पिण्याच्या पाण्याबातच्या व्यवस्थेबाबत अधिकाऱ्यांशी चर्चा केली असता या कार्यालयातील पाणीपुरवठा करणारी सबमर्सिबल बोअर काम करीत नसल्याने पिण्याच्या पाण्याची समस्या निर्माण झाल्याचे त्यांनी सांगितले. नागरिकांसाठी पर्यायी व्यवस्था म्हणून कार्यालयाकडून नागरिकांकरता पाण्याची त्यांची व्यवस्था करीत असल्याचे त्यांचे म्हणणे आहे.

# पुनर्वसनाशिवाय धरणाचे काम नाही !

♦ संतप्त रोहणखेडा-पर्वतापूर ग्रामस्थांनी धरणाचे काम पाडले बंद

प्रतिनिधी ४ जून

**अमरावती :** पेढी बॅरेजसाठी तब्बल ८५० एकर जमीन देऊन विस्थापित झालेल्या रोहणखेडा-पर्वतापूर येथील नागरिकांचा संयम अखेर सुटला असून पुनर्वसनाच्या मागणीसाठी त्यांनी थेट धरणाच्या कामावरच ब्रेक लावला आहे. 'आधी पुनर्वसन, मग धरणाचे काम' अशी ठाम भूमिका घेत संतप्त ग्रामस्थांनी पुनर्वसन स्थळी सुरू असलेले धरणाचे काम बंद पाडत प्रशासनाविरोधात तीव्र नाराजी व्यक्त केली. गेल्या अनेक वर्षांपासून पुनर्वसनाच्या प्रश्नावर प्रशासनाकडून केवळ आश्वासने दिली जात असून प्रत्यक्षात कोणतीही ठोस कार्यवाही होत नसल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. मौजे रामगाव येथील गट क्रमांक ४३ ची जमीन संपादित होऊन हस्तांतरणाची प्रक्रिया पूर्ण झाली असताना गट क्रमांक ११९ च्या संपादनाबाबत मात्र जाणीवपूर्वक अडथळे निर्माण केले जात असल्याचा आरोप आंदोलनकर्त्यांनी केला आहे. २ जून रोजी उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) यांना निवेदन देऊनही प्रशासनाने कोणतीही सकारात्मक भूमिका न घेतल्याने संतप्त नागरिकांनी आंदोलनाचा मार्ग स्वीकारला. धरणासाठी जमीन दिल्यानंतर शेती, रोजगार आणिउदरनिर्वाहाची साधने हिरावली गेली असून अनेक कुटुंबांवर उपासमारीची वेळ आल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. 'प्रशासनाला धरणाचे काम महत्त्वाचे वाटतेः मात्र ज्यांच्या जमिनी गेल्या त्या विस्थापितांच्या पुनर्वसनाचा प्रश्न दुर्लक्षित केला जात आहे.

# आमदार हरीश पिंपळे यांनी लक्ष्मीबाई देशमुख उपजिल्हा रुग्णालयाची केली पाहणी

प्रतिनिधी ४ जून



**मुर्तिजापूर :** श्रीमती लक्ष्मीबाई देशमुख उपजिल्हा रुग्णालयाला आमदार हरीश पिंपळे यांनी भेट देऊन विविध विभागांची सविस्तर पाहणी केली. रुग्णालयातील आरोग्य सेवा, स्वच्छता व रुग्णांना दिल्या जाणाऱ्या सुविधांचा त्यांनी प्रत्यक्ष आढावा घेतला. यावेळी आमदार पिंपळे यांनी एक्स-रे विभाग, ईसीजी विभाग, लसीकरण कक्ष, रुग्ण वॉर्ड तसेच स्वयंपाकगृहाची पाहणी करून रुग्णांना मिळणाऱ्या सेवांची माहिती घेतली. रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांशी संवाद साधून त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या. प्रत्येक नागरिकाला सरकारी रुग्णालयात दर्जेदार उपचार, आवश्यक औषधे आणि उत्तम आरोग्य सुविधा वेळेवर उपलब्ध व्हाव्यात, यासाठी प्रशासनाने विशेष लक्ष द्यावे, अशा सूचना त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या. तसेच रुग्णालय परिसरातील स्वच्छता आणि व्यवस्थापन अधिक सक्षम करण्यावर भर देण्याचे निर्देशही यावेळी देण्यात आले.

या पाहणी दरम्यान नगराध्यक्ष हर्षल साबळे, भाजप तालुकाध्यक्ष नंदकिशोर राऊत, रुग्णसेवक सुनीलभाऊ लछुवाणी, नगरसेवक लखन मिलांदे, वैद्यकीय अधिकारी डॉ. राजेंद्र नेमाडे तसेच रुग्णालयातील कर्मचारी उपस्थित होते.

रुग्णांना अधिक चांगल्या सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी प्रशासन कटिबद्ध असल्याचा विश्वास आमदार हरीश पिंपळे यांनी यावेळी व्यक्त केला.

# खामगावात चोरी; रोकड लंपास !

प्रतिनिधी ४ जून

**खामगाव :** शहरातील शिवाजीनगर परिसरात चोरट्यांनी भरदिवसा घरफोडी करत, तब्बल ५ लाख २० हजार रुपयांची रोकड लंपास केल्याची घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी शिवाजीनगर पोलिसांनी अज्ञात व्यक्तीविरुद्ध गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे. शिवाजीनगर जुना फैल परिसरात राहणारे योगेश प्रभाकर केवारे (वय ४०) हे संगणक जॉबवर्कचा व्यवसाय करतात. १ जून रोजी सकाळी ११ वाजेपासून सायंकाळी ७ वाजेपर्यंत त्यांच्या घरात कोणी नसल्याची संधी साधून अज्ञात चोरट्याने घरात प्रवेश केला. त्यानंतर घरातील लोखंडी कपाटाचे लॉकर उघडून त्यामध्ये ठेवलेली ५ लाख २० हजार रुपयांची रोकड घेऊन पोबारा केला. सायंकाळी घरी परतल्यानंतर ही चोरी उघडकीस आली. घटनेची खात्री झाल्यानंतर योगेश केवारे यांनी २ जून रोजी शिवाजीनगर पोलिस ठाण्यात धाव घेत तक्रार दाखल केली. फिर्यादीवरून गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

आपणा सर्वांच्या आशीर्वादाने आणि सहकार्याने आम्ही तीर्थंकर सुपरस्पेशालिटी हॉस्पिटलचा

(४ जून २००६ - ४ जून २०२६)

20

वा वर्धापन दिन साजरा करीत आहोत. असाच स्नेह कायम असू द्यावा.

डॉ. प्रशांत मुळावकर
युरोलॉजिस्ट

डॉ. उत्पला मुळावकर
प्लास्टीक सर्जन

आणि समस्त कर्मचारीगण

तीर्थंकर सुपरस्पेशालिटी हॉस्पिटल

चांडक मंगल कार्यालय जवळ, गड्डम प्लॉट, अकोला

Phone - 0724-2411437, 2425757 Mob. 9766123875, 8855943864

# अकोला शहरात अतिक्रमणविरोधात महापालिकेची धडक कारवाई

प्रतिनिधी ४ जून

बसस्थानक, रतनलाल प्लॉट, जवाहर नगर परिसरातील अतिक्रमणे हटवली विदर्भ हॉस्पिटलसमोरील रस्ते मोकळे नागरिकांनी व्यक्त केले समाधान




**अकोला :** अकोला शहरातील वाढत्या अतिक्रमणाच्या समस्येवर अखेर प्रशासनाने कारवाईचा बडगा उगारला आहे. बसस्थानक परिसर, रतनलाल प्लॉट, जवाहर नगर तसेच विदर्भ हॉस्पिटलसमोरील मुख्य रस्त्यावर करण्यात आलेल्या अतिक्रमण हटाव मोहिमेत अनेक अनधिकृत बांधकामे, हातगाड्या आणि रस्त्यावरील अडथळे हटविण्यात आले. या कारवाईमुळे वाहतुकीला अडथळा ठरणारे अतिक्रमण दूर झाल्याने नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे.

अकोला शहरातील प्रमुख रस्ते आणि व्यापारी भागांमध्ये दिवसेंदिवस वाढत असलेल्या अतिक्रमणामुळे वाहतूक कोंडीची समस्या गंभीर बनत होती. याची दखल घेत प्रशासनाने विशेष अतिक्रमण हटाव मोहीम राबवत बसस्थानक परिसर, रतनलाल प्लॉट, जवाहर नगर आणि विदर्भ हॉस्पिटलसमोरील भागात धडक कारवाई केली. या कारवाईदरम्यान रस्त्यावर अडथळा निर्माण करणाऱ्या अनधिकृत हातगाड्या, फेरीवाले, तात्पुरती शेड्स तसेच इतर अतिक्रमणे हटविण्यात आली. प्रशासनाच्या पथकाने संबंधितांना पूर्वसूचना देत नियमानुसार कारवाई केल्याची माहिती मिळाली आहे. अतिक्रमणामुळे नागरिकांना तसेच रुग्णवाहिका आणि इतर आपत्कालीन वाहनांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता. विशेषतः विदर्भ हॉस्पिटल परिसरात रुग्ण आणि त्यांच्या नातेवाईकांना वाहतुकीच्या समस्येमुळे त्रास सहन करावा लागत होता.या कारवाईनंतर संबंधित भागातील रस्ते मोकळे झाले असून वाहतुकीला दिलासा मिळाला आहे. अतिक्रमण पुन्हा होऊ नये यासाठी प्रशासनाने नियमित पाहणी करून आवश्यक ती कारवाई सुरू ठेवावी, अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.शहरातील रस्ते अतिक्रमणमुक्त ठेवण्यासाठी नागरिकांनीही सहकार्य करावे आणि सार्वजनिक जागांवर अनधिकृत अतिक्रमण टाळावे, असे आवाहन प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

# वाघ शिकार प्रकरणातील महिलेचा जामीन अर्ज फेटाळला

वि प्रतिनिधी ४ जून

**अकोटः** मेळघाट-अकोट वन्यजीव विभागाच्या हद्दीतील वाघ शिकारी प्रकरणातील महिला आरोपी गजेंद्रीबाई ऊर्फ शीतल रतन ऊर्फ टेरालिन पारधी (रा. देवरी, मध्य प्रदेश) हिचा जामीन अर्ज अकोट येथील अतिरिक्त जिल्हा व विशेष सत्र न्यायाधीश बी. एम. पाटील यांनी फेटाळला. खिरकुंड वनक्षेत्रात ६ ऑगस्ट २०१३ रोजी वाघाची शिकार करून त्याची कातडी व हाडे विकल्याप्रकरणी वन्यजीव संरक्षण अधिनियमांतर्गत गुन्हा दाखल आहे. या प्रकरणात आरोपीला मध्य प्रदेशातील मंडला कारागृहातून प्रॉडक्शन वॉरंटद्वारे ताब्यात घेण्यात आले होते. सरकार पक्षातर्फे ॲड. अजित देशमुख यांनी युक्तिवाद करताना या प्रकरणातील इतर आरोपींना यापूर्वी शिक्षा झाल्याचे तसेच गजेंद्रीबाई २०१२ पासून फरार असल्याचे न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले. तिच्याविरुद्ध अन्य वन्यजीव शिकारीचे गुन्हेही दाखल असल्याचा दावा करण्यात आला. यानंतर न्यायालयाने जामीन अर्ज फेटाळण्याचा आदेश दिला.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी भास्कर प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट क्र. टी- ५१ एम. आय. डी. सी. फेज - ४, अकोला ग्रोथ सेंटर, येवता रोड, शिवणी, अकोला - ४४४००२ येथे मुद्रित करून सिटी न्यूज सुपरफास्ट कार्यालय, उत्सव संकुल, गांधी रोड, अकोला येथे प्रकाशित केले. ▪ मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख ▪ संपर्क – 0724-2435573, 2444774 - email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/ 2012 / 49642, RRC Helpline No. 8484842135

CMYK CMYK